महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २७९ वे दिनांक : ०५/१०/२०२६ वार : सोमवार

## 'जातनिहाय जनगणनाच आरक्षणावरील उपाय': पण राज्य सरकार फोडा अन् राज्य करा ही ब्रिटिशनीती वापरतंय- हर्षवर्धन सपकाळ



**मुंबई :** ओबीसी समाजाच्या हक्कांचा मुद्दा आणि जातनिहाय जनगणनेच्या मागणीवरून काँग्रेसने पुन्हा एकदा केंद्र व राज्यातील भाजप सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. काँग्रेस मुख्यालय टिळक भवन येथे ओबीसी कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर आणि 'मंडल विरुद्ध मनुवाद' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमात काँग्रेस नेत्यांनी ओबीसी समाजाला राजकीय प्रतिनिधित्व, आरक्षण आणि सामाजिक समतेच्या मुद्द्यावर संघटित होण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाला काँग्रेसचे प्रभारी डॉ. सिरिवेल्ला प्रसाद, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सचिव रेहाना चिस्ती, ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. यशपाल भिंगे, खासदार प्रतिभा धानोरकर, प्रवक्ते हनुमंत पवार आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना काँग्रेसचे प्रभारी डॉ. सिरिवेल्ला प्रसाद यांनी राहुल गांधी यांच्या जातनिहाय जनगणनेच्या भूमिकेचे समर्थन केले. ओबीसी समाजाचा मुद्दा देशाच्या राजकारणात प्रखरपणे मांडण्याचे काम राहुल गांधी यांनी केले, असा दावा त्यांनी केला.

"जातव्यवस्थेमुळे समाजातील विविध जातींमध्ये वाद निर्माण झाले. या व्यवस्थेत ओबीसी समाजाला खालचे स्थान देऊन त्याचा गैरवापर करण्यात आला. मात्र, आता या व्यवस्थेत बदल करण्याची गरज आहे. प्रत्येक समाजाची लोकसंख्या किती आहे, त्यानुसार त्याला प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. त्यासाठी राहुल गांधी यांनी जातनिहाय जनगणनेचा मुद्दा जोरकसपणे पुढे आणला," असे डॉ. प्रसाद म्हणाले.

राहुल गांधी यांनी सातत्याने जातनिहाय जनगणनेची मागणी केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जातनिहाय जनगणनेबाबत निर्णय जाहीर करावा लागला, असा दावाही त्यांनी केला.

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महाराष्ट्रातील आरक्षणाच्या प्रश्नावरून राज्य सरकारवर टीका केली. राज्यात विविध समाज आरक्षणासाठी आंदोलने करत आहेत. या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी ५० टक्के आरक्षणाची मर्यादा वाढवणे आणि जातनिहाय जनगणना करणे हाच प्रभावी उपाय आहे, असे ते म्हणाले.

सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही आरोप केले. "आरक्षणाच्या नावाखाली फडणवीस सरकारने मराठा आणि ओबीसी समाजात भांडणे लावली," असा आरोप त्यांनी केला. फोडा, तोडा आणि राज्य करा ही ब्रिटिशांची नीती वापरली जात असल्याचेही त्यांनी म्हटले.

काँग्रेस आघाडी सरकारने मराठा समाजाला दिलेले आरक्षण फडणवीस सरकारने पुढे सुरू ठेवले असते, तर आजची परिस्थिती निर्माण झाली नसती, असा दावाही सपकाळ यांनी केला.

विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी ओबीसी समाजाच्या राजकीय भूमिकेवर भाष्य करत भाजपवर निशाणा साधला. "ओबीसी समाज भाजपच्या पाठीशी उभा राहिला, मात्र भाजपने या समाजाला काहीही दिले नाही," असा आरोप त्यांनी केला.

राहुल गांधी यांनी ओबीसींच्या हक्कांसाठी सर्वप्रथम आवाज उठवला आणि त्यांच्या भूमिकेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जातनिहाय जनगणनेची घोषणा केली, असे वडेट्टीवार म्हणाले.

मंडल आयोगाने ओबीसी समाजासाठी २७ टक्के आरक्षणाची शिफारस केली होती. हे आरक्षण सामाजिक, शैक्षणिक आणि नोकरीच्या क्षेत्रातील प्रतिनिधित्वासाठी होते. मात्र, मंडल आयोगाच्या आंदोलनात मनुवादी विचारसरणीच्या लोकांनी शिरकाव करून ओबीसी समाजात गैरसमज निर्माण केले, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

"मनुवाद्यांनी जातीजातींमध्ये विष पेरण्याचे काम केले. या मनुवादी विचाराला गाडण्याचे काम समतेचा विचारच करू शकतो," असे वडेट्टीवार यांनी म्हटले.

ओबीसी विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. यशपाल भिंगे यांनी मंडल आयोग आणि बी. पी. मंडल यांच्या योगदानाचा उल्लेख केला. देशातील ओबीसी समाजाला राजकीय आणि सामाजिक ओळख मिळवून देण्याचे मोठे काम बिहारचे माजी मुख्यमंत्री बी. पी. मंडल यांनी केले, असे ते म्हणाले.

ज्या काळात ओबीसी समाजाला स्पष्ट राजकीय चेहरा नव्हता, त्या काळात बी. पी. मंडल यांनी ओबीसी समाजाची आकडेवारी गोळा करून त्यांच्या हक्कांसाठी भूमिका मांडली आणि २७ टक्के आरक्षणाची शिफारस केली, असे भिंगे यांनी सांगितले.

"ओबीसी समाज आता केवळ मतदान करणारा राहता कामा नये, तर नेतृत्व करणारा बनला पाहिजे," असे आवाहन त्यांनी केले. त्यासाठी काँग्रेसने 'हर एक ओबीसी, बनेगा काँग्रेसी' हा संकल्प केला असल्याचेही त्यांनी सांगितले.

याच कार्यक्रमात 'मंडल विरुद्ध मनुवाद' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. ओबीसी समाज, मंडल आयोग, आरक्षण आणि मनुवाद या विषयांबाबत सर्वसामान्य काँग्रेस कार्यकर्त्यांनाही माहिती समजावी, या उद्देशाने हे पुस्तक लिहिण्यात आल्याचे प्रा. यशपाल भिंगे यांनी सांगितले.

ओबीसी समाजाच्या प्रश्नांवर कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करणे, जातनिहाय जनगणनेचे महत्त्व समजावून सांगणे आणि सामाजिक समतेचा विचार तळागाळापर्यंत पोहोचवणे, या उद्देशाने या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमातून काँग्रेसने ओबीसी आरक्षण, जातनिहाय जनगणना आणि सामाजिक प्रतिनिधित्वाच्या मुद्द्यांवर आक्रमक भूमिका कायम ठेवण्याचे संकेत दिले.

## अर्धा किलोमीटर चालून मोर्चा यशस्वी? शिरसाटांचा ठाकरेंना टोला



**छत्रपती संभाजीनगर :** केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विविध मुद्द्यांवरून ठाकरे बंधूंच्या नेतृत्वाखाली आज मुंबईत काढण्यात आलेला 'गर्जना मोर्चा' चर्चेत आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील या मोर्चावरून शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगरमधून जोरदार टीका केली आहे. मुंबईतल्या मोर्चापेक्षा दोन भाऊ एकत्र येतात, याची चर्चा आहे. पब्लिसिटीसाठी टी-शर्ट घालून हवा करण्याचा हा मोर्चा आहे, असे म्हणत त्यांनी ठाकरे बंधूंची खिल्ली उडवली.

संजय शिरसाट यांनी ठाकरे बंधूंना थेट सवाल करत त्यांच्या एकत्रित येण्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "ज्ञानेश कुमार यांच्या विरोधातला मोर्चा म्हणताय, एकातरी पक्षाने सहकार्य केलं का तुम्हाला? बरं, नेतृत्व कोणाचं? उद्धव की राजचं हेही सांगा, असा खोचक सवाल मंत्री शिरसाट यांनी उपस्थित केला. निवडणूक आयोगाविरोधात काढण्यात आलेल्या या मोर्चामुळे राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत.

पुढे बोलताना संजय शिरसाट म्हणाले, आज मुंबईत जो मोर्चा निघतोय त्यापेक्षा दोन भाऊ एकत्र येतायत, याचीच चर्चा आहे. पब्लिसिटीसाठी हा मोर्चा आहे. टी-शर्ट घालून हवा करण्याचा मोर्चा आहे. हे अर्धा किलोमीटर चालणार आणि यशस्वी झाला असं दाखवणार. ज्ञानेश कुमार यांच्या विरोधातला मोर्चा आहे, असं म्हणताय एकतरी पक्षाने सहकार्य केलं का? बरं नेतृत्व कोणाचे उद्धव की राजचे हेही सांगा.

हा इव्हेंट आहे, याला फार प्रतिसाद मिळणार नाही.टी-शर्ट वाटून काढलेला हा मोर्चा आहे.कसली गर्जना?हातात हात घालून फोटो काढण्याचा हा मोर्चा. मग जंतर-मंतरवर जा. चलो दिल्ली म्हणा, यांना माहिती आहे, यांना माहिती टिकत नाही म्हणून उगाच करत आहेत. शरद पवार किंवा अजून कोणाचा पाठिंबा?कुणी त्यांचे लोक गेले का? असा सवाल संजय शिरसाट यांनी उपस्थित केला.

तसेच सीजेपीला यांनीच विरोध केला होता. स्वतःचे सक्सेस दाखवायला की आजची अस्तित्वाची लढाई आहे. संजय राऊत म्हटल्यावर कोणी येईल कोणी जाईल असे होईल का? मागणी करताना योग्य करावी, ज्ञानेश कुमार यांच्याबाबत मागणी योग्य असेल तर त्याचा विचार केंद्र सरकार करेल, असेहीह संजय शिरसाट यांनी म्हटले.

## राष्ट्रपतींची निवडणूक होते मग निवडणूक आयुक्तांची का नाही? - उद्धव ठाकरे

**मुंबई :** देशात राष्ट्रपतींची निवडणूक होते तर मग निवडणूक आयुक्तांची निवडणूक का होत नाही नेमणूक कशी होते असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला आहे. त्या कमिटीमध्ये सरन्यायाधीश, पंतप्रधान आणि विरोधी पक्षनेते होते. पण आता त्यामधून सरन्यायधीश काढून टाकत पंतप्रधान म्हणतील तो मंत्री टाकला. अमित शहा यांना घेण्यात आले. कोर्टात सुनावणी सुरू असताना यांनी नेमणूक करण्यात आली आहे. आर.के. सिंह यांनी सांगितले आहे की एसआयआर हा गैरकायदा आहे. तर निवृत्त न्यायमूर्ती धुलिया म्हणाले की नागरिकत्व रद्द करण्याचा अधिकार हा गृहमंत्र्यांचा आहे निवडणूक आयोगाचा नाही. पण अमित शहा तो अधिकार निवडणूक आयुक्तांच्या माध्यमातून वापरत असल्याने आम्हाला ज्ञानेशकुमार नको आहेत.असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले की, आपल्या देशाचा आणि आपल्या स्वातंत्र्याचा हा लढा आपण लढतो आहोत. मेक इन इंडियामध्ये जर हुकुमशहा तयार होणार असेल तर त्याला देशात गाडून टाकण्यासाठी आम्ही एकत्र उभे राहिलो आहोत. राज्यात २ कोटी मतदार वगळले गेले आहेत, तर देशात १३ कोटी मतदार वगळले गेले आहेत. हे तुम्हाला मान्य आहे का? तामिळनाडू, बंगालमध्ये मतदार वगळण्यात आले. त्यातील काही लोकांचे मते वैध ठरली. पण या मतदारांना पोटनिवडणुकीसाठी मतदान करता येणार आहेत का? हा विषय सुप्रीम कोर्टात आहेत. देश काही ज्ञानेश कुमार यांच्या वडीलांचा नाही. त्यांना जे सुरक्षा देण्यात आली आहे तशी सुरक्षा राष्ट्रपतींना सुद्धा नाही. निवृत्त झाल्यावर सुद्धा त्यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल करता येणार नाही. मनमानीपणाने काम करणार असाल तर चालणार नाही. त्यांना जनता शिक्षा दिल्याशिवाय राहणार नाही.

उद्धव ठाकरे म्हणाले की, देशातील तब्बल १३ कोटी मतदार अवैध ठरवले जात असून, हा सर्व तपास पूर्ण करण्यासाठी तब्बल १४६ महिने लागतील, असा दावा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला आहे. देशाच्या सुरक्षेसाठी आपले सैनिक अहोरात्र झटत असताना, अमित शहा यांनी एका महिलेविरुद्ध स्वतःचा पक्ष जिंकावा म्हणून चक्क सैन्य घुसवले.

या सर्व प्रकारानंतर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे एक वाक्य आपल्याला प्रकर्षाने आठवते, की ही लोकशाही मी मानत नाही; या दळभद्री लोकशाहीला आम्ही गाडून टाकल्याशिवाय राहणार नाही, असे सांगत उद्धव ठाकरेंनी सत्तेतील लोकशाहीच्या कार्यपद्धतीवर जोरदार हल्लाबोल केला. बाळासाहेब कधीही पवित्र लोकशाहीबद्दल बोलले नव्हते, त्यांच्या मते लोकशाही नेहमी पवित्र असली पाहिजे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०५ ऑक्टोबर २०२६


## बिल्डा येथील राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालयात गांधी व शास्त्री जयंती साजरी




**बिल्डा :** या दोन्ही राष्ट्र नेत्यांच्या जयंतीनिमित्त आज भारतरत्न राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालयात प्राचार्य संतोष पुंडगे सर यांनी दोन्ही महा पुरुष यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.....या वेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थितीत होते यावेळेस सत्य, अहिंसा, न्याय व राष्ट्रभक्ती हक्क या विविध विषयांवर प्रा.पुंडगे सर यांनी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जिवन चरित्रावर एक प्रकाश टाकला त्यांनी केलेल्या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान व विचार हे आपल्या भाषणात स्पष्ट केले या प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री.आकाश गायकवाड यांनी केले.

## दुष्काळ निर्मूलन तात्पुरत्या मलमपट्ट्या न लावता कायमस्वरूपी उपाययोजना हव्यात

**धाराशिव :** मराठवाड्याच्या वाट्याला येणारा नियतीचा दुष्काळ हा कायमस्वरूपी हटवण्यासाठी स्वतंत्र उपाययोजना हव्यात असे प्रतिपादन महाराष्ट्र लोकविकास मंचचे राष्ट्रीय अध्यक्ष विश्वनाथ अण्णा तोडकर यांनी केले. महाराष्ट्रातील स्वयंसेवी संस्थांच्या कार्यशाळेची आयोजन महाराष्ट्र लोकविकास मंच या स्वयंसेवी संघटनेच्या वतीने करण्यात आले होते. या गुगल मीटमध्ये महाराष्ट्रातल्या सातारा, सांगली,पुणे,बीड, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा,अशा विविध जिल्ह्यातून स्वयंसेवी संस्था सहभागी झाल्या होत्या. जल हे जीवन आहे त्याचं संगोपन आणि योग्य वापर होण्यासाठी सरकारने ठोस उपाय योजना कराव्यात. कमी पाण्यात जास्त पीक घेणे आणि मराठवाडा दुष्काळ मुक्त करणे यासाठी सरकारने योग्य निर्णय घेऊन दुष्काळमुक्त मराठवाडा आणि महाराष्ट्र करावा या विषयावरती जागतिक लेवलवरचे पाणी तज्ज्ञ विलास कुलकर्णी पुणे यांनी आपले विचार मांडले . यानंतर कायमस्वरूपी दुष्काळ मुक्त व्हावा पाण्याचं सू नियोजन व्हावं पडणाऱ्या पाण्याचा प्रत्येक थेंब हा पाणी मुरण्यासाठी आणि जतन करण्यासाठी व्हावा छोट्या छोट्या उद्योग व्यवसाय करणाऱ्यांना पाठबळ द्यावं. शेतीची सर्व कामे रोजगार हमी योजनेला जोडली जावीत. या विषयावरती माननीय विश्वनाथ अण्णा यांनी विचार मांडले. या सर्व विचार प्रवाहामध्ये महाराष्ट्रातल्या अनेक विशेषतज्ञानी यामध्ये सहभाग नोंदवला. सरकारने तात्पुरत्या उपाययोजना न करता कायमस्वरूपी मराठवाड्यातला दुष्काळ नव्हे तर महाराष्ट्राला दुष्काळ मुक्त करण्यासाठी ठोस निर्णय घ्यावेत. दुष्काळमुक्त महाराष्ट्र 2030 याची बांधणी करावी असा एकूणच सर्व स्वर स्वयंसेवी संस्थांचा निर्माण झाला होता.

या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र लोकविकास मंच, उत्तरदायित्व NGO फाउंडेशन यांच्यावतीने करण्यात आले होते. सूत्रसंचालन प्रस्तावना आणि आभार भूमिपुत्र वाघ यांनी केले..

# डॉ. सुनीता बाजपाई यांच्या प्रदीर्घ सेवेचा गौरवपूर्ती समारंभ संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयाच्या माजी प्रभारी प्राचार्या तथा वाणिज्य विभागातील प्राध्यापिका डॉ. सुनीता बाजपाई यांच्या प्रदीर्घ व समर्पित सेवाकार्याबद्दल सेवापूर्ती गौरव समारंभाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. यावेळी त्यांच्या ३२ वर्षांच्या शैक्षणिक, प्रशासकीय व संस्थात्मक योगदानाचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल होत्या.

यावेळी प्राध्यापक प्रतिनिधी डॉ. प्रेमला मुखेडकर, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. सुनंदा चक्रनारायण, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. परभाणे यांची प्रमुख उपस्थिती होती.डॉ. सुनीता बाजपाई यांनी आपल्या प्रदीर्घ सेवापर्वात विविध जबाबदाऱ्या अत्यंत सक्षमपणे सांभाळल्या. त्यांनी २९ वर्षे अध्यापनाचे कार्य केले, तर तीन वर्षे प्रभारी प्राचार्य म्हणून महाविद्यालयाची धुरा सांभाळली. त्यांच्या कार्यकाळात महाविद्यालयात विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले. त्यांनी विविध समित्यांमध्ये काम दिले. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना दोन वेळा रोटरी क्लबचा 'नेशन बिल्डर अवॉर्ड' प्राप्त झाला असून, २०२६ मध्ये मराठवाडा लीगल अँड जनरल एज्युकेशन सोसायटीतर्फे देण्यात येणारा 'बेस्ट टीचर अवॉर्ड'ही त्यांना प्रदान करण्यात आला आहे.यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, सहकारी तसेच त्यांच्या स्नेहीजनांनी डॉ. बाजपाई यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू आणि प्रदीर्घ सेवाकार्याच्या आठवणींना उजाळा देत मनोगते व्यक्त केली. डॉ. रजनी सेनाड, डॉ. सुनंदा चक्रनारायण, डॉ. मीनल श्रीगिरीवार, प्रा. मंगल मोरे, डॉ. प्रभाकर गायकवाड, प्रा. त्रिपती वरपडे, प्रा. शरद देशमुख, प्रा. श्याम घोरताळे तसेच माजी आमदार श्री. श्रीकांत जोशी, डॉ. मेधा मिसळ, डॉ. सुषमा चांदोरकर आदींनी त्यांच्या कार्याचा गौरव करत भावपूर्ण आठवणी सांगितल्या.प्राध्यापकवर्ग, पतसंस्था, विद्यार्थिनी आणि स्नेहीजन यांच्या वतीने डॉ. सुनीता बाजपाई यांचा सन्मान करण्यात आला. विविध संस्थांच्या व सहकाऱ्यांच्या वतीने झालेल्या या सत्कारामुळे कार्यक्रमाला भावनिक आणि आपुलकीचे स्वरूप प्राप्त झाले.सत्काराला उत्तर देताना डॉ. सुनीता बाजपाई यांनी संस्थेबद्दल आणि महाविद्यालयाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. संस्थेने वेळोवेळी दाखविलेला विश्वास, महाविद्यालयाने दिलेल्या संधी आणि सहकाऱ्यांकडून मिळालेले प्रेम व सहकार्य यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करताना त्या भावुक झाल्या. आपल्या सेवाकाळातील अनुभव आणि सहकाऱ्यांच्या प्रेमाच्या आठवणींना उजाळा देताना त्यांनी महाविद्यालयाशी असलेले आपले ऋणानुबंध अधोरेखित केले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ. अन्विता अग्रवाल यांनी डॉ. सुनीता बाजपाई यांच्या ३२ वर्षांच्या प्रदीर्घ, समर्पित आणि संघर्षमय सेवाप्रवासाचा गौरव केला. योगदान तत्त्वावरील व्याख्याता ते पूर्णवेळ प्राध्यापक, विभागप्रमुख आणि प्रभारी प्राचार्य असा त्यांचा प्रवास जिद्द, परिश्रम, सातत्यपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांच्या कार्यातून नव्या पिढीतील प्राध्यापक व विद्यार्थिनींना प्रेरणा मिळेल, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रेमला मुखेडकर आणि डॉ. मीनाक्षी देव यांनी केले, तर आभारप्रदर्शन सुषमा देशपांडे यांनी केले. शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ्यांच्या सहकार्याने सेवापूर्ती गौरव समारंभ संपन्न झाला.


**जाहिरात दर**

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०५ ऑक्टोबर २०२६


# वन्यजीवांचे संरक्षण म्हणजेच आपल्या भविष्याचे संरक्षण

**व**न्यजीव सप्ताह हा केवळ वाघ, सिंह, हत्ती, हरिण किंवा इतर वन्यप्राण्यांविषयी माहिती देण्याचा उपक्रम नसून निसर्ग, जैवविविधता, पर्यावरणीय संतुलन आणि मानवी जीवन यांच्यातील अतूट संबंध समजून घेण्याची एक महत्त्वपूर्ण संधी आहे. पृथ्वीवरील प्रत्येक सजीव हा परिसंस्थेतील एका मोठ्या साखळीचा महत्त्वाचा दुवा आहे. एखादी प्रजाती नष्ट झाली किंवा तिची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली, तर त्याचा परिणाम केवळ त्या प्रजातीपुरता मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण परिसंस्थेच्या संतुलनावर होतो. आज वाढते शहरीकरण, वृक्षतोड, औद्योगिकीकरण, अनियंत्रित बांधकाम, प्रदूषण, प्लास्टिकचा वाढता वापर, नैसर्गिक अधिवासाचा ऱ्हास आणि बेकायदेशीर वन्यजीव व्यापार यामुळे जैवविविधतेसमोर अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यामुळे "वन्यजीवांचे संरक्षण करा, जैवविविधता जपा आणि आपले भविष्य सुरक्षित करा" हा संदेश केवळ वन्यजीव सप्ताहापुरता मर्यादित न राहता आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनणे आवश्यक आहे.वन्यजीवांच्या अस्तित्वासाठी त्यांचा नैसर्गिक अधिवास सुरक्षित असणे अत्यंत आवश्यक आहे. जंगल, गवताळ प्रदेश, नदीकाठ, तलाव, नद्या, झुडपी प्रदेश, शेती परिसर, वृक्षसमृद्ध भाग आणि विविध प्रकारचे जलस्रोत हे असंख्य प्राणी, पक्षी, कीटक आणि सूक्ष्मजीवांचे निवासस्थान आहेत. वन्यजीवांना अन्न, पाणी, निवारा आणि प्रजननासाठी योग्य जागा मिळाली नाही तर त्यांचे अस्तित्व धोक्यात येते. अधिवास नष्ट झाल्यामुळे अनेक प्राणी मानवी वस्त्यांच्या जवळ येतात आणि मानव—वन्यजीव संघर्ष वाढण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे स्थानिक आणि देशी वृक्षांचे संवर्धन करणे, केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या झाडांचे दीर्घकालीन संगोपन करणे, तलाव, नद्या, ओढे आणि इतर जलस्रोतांचे प्रदूषण रोखणे, नैसर्गिक अधिवासातील अतिक्रमणाला प्रतिबंध करणे, पक्षी व लहान प्राण्यांसाठी सुरक्षित अधिवास निर्माण करणे आणि वन्यजीवांच्या हालचालींचे नैसर्गिक मार्ग सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. "झाडे वाचवा म्हणजे अधिवास वाचवा; अधिवास वाचवा म्हणजे वन्यजीव वाचवा."आज प्लास्टिक प्रदूषण हे पर्यावरणासमोरील गंभीर आव्हान बनले आहे. प्लास्टिकच्या पिशव्या, बाटल्या, खाद्यपदार्थांचे पॅकेजिंग, थर्माकोल आणि इतर प्लास्टिक कचरा नद्या, तलाव, शेतजमीन, रस्ते आणि नैसर्गिक अधिवासांमध्ये पोहोचतो. प्लास्टिक कचरा वन्यजीवांच्या अधिवासात पोहोचल्यास प्राणी किंवा पक्षी तो अन्न समजून खाऊ शकतात. काही वेळा प्लास्टिकमध्ये प्राणी अडकू शकतात. जलस्रोतांमध्ये जमा झालेला प्लास्टिक कचरा जलचर जीवांसाठीही घातक ठरतो. यासाठी प्रत्येक नागरिकाने "Reduce — Reuse — Recycle" म्हणजेच वापर कमी करा, पुनर्वापर करा आणि पुनर्चक्रण करा हा दृष्टिकोन स्वीकारणे गरजेचे आहे. एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर टाळणे, कापडी किंवा पुनर्वापर करता येणाऱ्या पिशव्यांचा वापर करणे, प्लास्टिक आणि ओला-सुका कचरा स्वतंत्र ठेवणे, प्लास्टिक कचरा नदी, नाला, तलाव किंवा जंगलात न टाकणे, सार्वजनिक ठिकाणी प्लास्टिकमुक्त परिसर निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे आणि शाळा-महाविद्यालये व ग्रामपंचायतीमार्फत प्लास्टिक संकलन अभियान राबविणे आवश्यक आहे. "प्लास्टिकमुक्त परिसर — सुरक्षित वन्यजीव — निरोगी पर्यावरण" हा संदेश प्रत्येक गावाने स्वीकारण्याची गरज आहे.वन्यजीवांची बेकायदेशीर शिकार, पकड, तस्करी आणि अवैध व्यापार हे जैवविविधतेसाठी गंभीर धोके आहेत. वन्यजीवांच्या अवैध व्यापारामुळे केवळ एखाद्या प्राण्याची संख्या कमी होत नाही, तर संपूर्ण परिसंस्थेतील नैसर्गिक संतुलन बिघडण्याची शक्यता असते. वन्यजीवांचे अवयव, कातडी, शिंगे, दात, पिसे किंवा इतर भागांसाठी होणारी शिकार ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी कायदे, वनविभागाची कार्यवाही आणि नागरिकांची जागरूकता या तिन्हींची आवश्यकता आहे. नागरिकांनी संशयास्पद शिकार, वन्यजीव पकडणे किंवा अवैध वन्यजीव व्यापार आढळल्यास स्वतः कायदा हातात न घेता संबंधित वनविभाग किंवा सक्षम प्राधिकरणाला माहिती द्यावी. तसेच वन्यजीवांपासून बनविलेल्या बेकायदेशीर वस्तूंची खरेदी न करणे हीसुद्धा संवर्धनातील महत्त्वाची भूमिका आहे. "वन्यजीव विकत घेणारा नसेल, तर वन्यजीवांची शिकार करणाऱ्याला बाजारपेठ मिळणार नाही."वन्यजीव हे आपल्या मनोरंजनासाठी किंवा छायाचित्रणासाठी निर्माण झालेले नाहीत. त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार आहे. जंगलभ्रमंती, वन्यजीव निरीक्षण किंवा पक्षी निरीक्षण करताना वन्य प्राण्यांच्या जवळ जाणे, त्यांना अन्न देणे, त्यांचा पाठलाग करणे, मोठ्या आवाजात संगीत किंवा आरडाओरड करणे, फ्लॅशचा अनावश्यक वापर करणे, पक्ष्यांच्या घरट्यांना किंवा प्रजननस्थळांना त्रास देणे आणि वन्यजीवांना पकडण्याचा किंवा हाताळण्याचा प्रयत्न करणे टाळले पाहिजे. "वन्यजीव पाहा, पण सुरक्षित अंतर ठेवा; छायाचित्र घ्या, पण निसर्गाला त्रास देऊ नका." हीच जबाबदार वन्यजीव पर्यटन आणि निसर्ग निरीक्षणाची योग्य भूमिका आहे.वन्यजीव हे पर्यावरणाचे केवळ घटक नसून परिसंस्थेचे संतुलन राखणारे नैसर्गिक सहकारी आहेत. पक्षी अनेक वनस्पतींच्या बियांचा प्रसार करतात. काही पक्षी आणि कीटक शेतीतील कीड नियंत्रित करण्यास मदत करतात. मधमाश्या, फुलपाखरे आणि इतर परागीभवन करणारे जीव वनस्पतींच्या पुनरुत्पादनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. विविध भक्षक प्राणी अन्नसाखळीतील इतर प्राण्यांची संख्या नियंत्रित ठेवतात. यामुळे वन्यजीवांचे संवर्धन हे केवळ जंगलांचे संरक्षण नसून शेती, अन्नसुरक्षा, जलसुरक्षा आणि मानवी आरोग्याशी संबंधित विषय आहे. निसर्गातील प्रत्येक जीवाची भूमिका वेगळी आहे. एखादा छोटासा कीटक, पक्षी किंवा बेडूक आपल्याला नगण्य वाटला तरी तो परिसंस्थेतील महत्त्वाचे कार्य करत असतो. "लहान जीव असो वा मोठा प्राणी—परिसंस्थेत प्रत्येकाचे स्थान आणि योगदान महत्त्वाचे आहे."वन्यजीव संवर्धनाची सुरुवात लहान कृतींपासून होते. विद्यार्थ्यांनी पक्षी निरीक्षण करणे, झाडे ओळखणे, परिसरातील जैवविविधतेची नोंद करणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे आणि इतरांमध्ये जनजागृती करणे हीदेखील संवर्धनाची प्रभावी पावले आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील प्राणीशास्त्र शिकवण्याऐवजी निसर्गाशी प्रत्यक्ष जोडणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून स्थानिक जैवविविधतेचा अभ्यास करण्याची संधी देणे, हा अशा उपक्रमांचा व्यापक उद्देश आहे.या वन्यजीव सप्ताहाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिकाने नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण करण्याचा, प्लास्टिकचा वापर कमी करण्याचा, बेकायदेशीर शिकार व वन्यजीव व्यापाराविरोधात जागरूक राहण्याचा, स्थानिक पक्षी व जैवविविधतेची नोंद करण्याचा, वन्यजीवांचा आदर करून सुरक्षित अंतर राखण्याचा, जलस्रोत स्वच्छ व सुरक्षित ठेवण्याचा आणि वन्यजीव संवर्धनाचा संदेश इतरांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे.वन्यजीव सप्ताह संपल्यानंतरही संवर्धनाची ही भावना कायम राहणे गरजेचे आहे. वन्यजीवांचे संरक्षण ही एक दिवसाची जबाबदारी नाही; ती प्रत्येक दिवसाची, प्रत्येक नागरिकाची आणि प्रत्येक पिढीची सामूहिक जबाबदारी आहे. आपल्या परिसरातील एका पक्ष्याला ओळखणे, एका झाडाचे संरक्षण करणे, प्लास्टिकची एक पिशवी टाळणे, जलस्रोतामध्ये कचरा न टाकणे किंवा वन्यजीवाला त्रास न देणे—या छोट्या कृती भविष्यात मोठा पर्यावरणीय बदल घडवू शकतात.कारण वन्यजीव वाचले तर जैवविविधता वाचेल; जैवविविधता वाचली तर परिसंस्था वाचेल; आणि परिसंस्था सुरक्षित राहिली तरच मानवाचे भविष्य सुरक्षित राहील."पक्षी ओळखा — निसर्ग समजा — जैवविविधता जपा!""वन्यजीवांचे संरक्षण करा — नैसर्गिक अधिवास वाचवा — आपले भविष्य सुरक्षित करा!"


**डॉ. विशाल विजयकुमार वैद्य**
प्राणीशास्त्र विभाग,
एस. के. गांधी कला,
अमोलक विज्ञान व पी. एच. गांधी
वाणिज्य महाविद्यालय, कडा


# पाहू नको अंत!

कुठे शोधू मेघराजा, शेत सारे करपले.
कुठे गेला अचानक, शेत माझे तडकले.

शेती मातीतले पीक,उभ्या उभ्याने जळाले.
झळा उन्हाच्या सोसूनी,सारे दुःखात गळाले.

दुष्काळाच्या अंगणात,बळीराजा उभा आहे.
कोण सांधणार हात,बळीराजा वाट पाहे.

माय बाप मेघराजा, यावे वेगात धावून.
दोन मुलांचे शिक्षण,गेले अर्ध्यात राहून.

बाप जगाचा पोशिंदा, संकटात अडकला.
साऱ्या जगाच्या चिंतेने,अचानक भडकला.

अरे नभातल्या ढगा!तुला फुटू दे रे घाम.
तुझ्याविना शेतामध्ये,कोळंबले माझे काम.

असा कसा रे निष्ठुर,बळी राजाशी वागतो.
हात जोडूनी दिवसा, तुला पाऊस मागतो.

पुन्हा करितो विनंती,आता परतुनी यावे.
शेती मातीला आधार,खूप बरसून जावे.

असा कसा वागतोस,मना वाटतोय खंत.
तुझ्या हातातले सारे,आता पाहू नको अंत,

खूप झाले विनवणी,हाती रुमणे घेणारं.
राग होता अनावर,चोप पाठीत देणारं.




**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


# मैत्री

निथळ खळखळ
वाहते निर्मळ
गाते मंजूळ गाणे
या धारेवर
जीव सुखवाया
त्याचे समर्पिने
ना यावा खडक उरी
ना भासावी खोल दरी
बहरूनिया यावी
फुलदाणी ती
गंधित व्हावे
सुगंध नवे
झुळूक हवेची
थंड असावी
मंत्रमुग्ध करिता
मने रिझवावी
घाटमाथा
डोंगर दर्या अणं
हिरवळ माजुनी जावी
इथेच साऱ्या मित्रांसवे
कृष्ण बासरी गावी....


**भूमिपुत्र वाघ**


# ६ व्या राज्यस्तरीय अधिवेशनाच्या पूर्वतयारी व नियोजनाबाबत बैठकीचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर :** कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र राज्याचे ४६ वे राज्यस्तरीय अधिवेशन दिनांक १९ ऑक्टोबर २०२६ रोजी मा. कृष्णा इंगळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे संपन्न होणार आहे.सदर अधिवेशनाच्या उत्कृष्ट नियोजन व पूर्वतयारीबाबत चर्चा करण्यासाठी महासंघाचे सर्व राज्य व विभागीय पदाधिकारी, सर्व जिल्हाध्यक्ष, तसेच संलग्न सर्व शाखांचे जिल्हा पदाधिकारी यांची तातडीची नियोजन बैठक आयोजित करण्यात आली आहे.बैठकीचा तपशील: * दिनांक: रविवार, ०४ ऑक्टोबर २०२६ * वेळ: सकाळी १०:०० वाजता * स्थळ: सुभेदारी विश्रामगृह, छ. संभाजीनगर अधिवेशनाची यशस्वी रचना आणि अंमलबजावणी या दृष्टीने ही बैठक अत्यंत महत्त्वाची आहे.

तरी सर्व संबंधित पदाधिकाऱ्यांनी वेळेवर व न चुकता उपस्थित राहावे, ही नम्र विनंती.




महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०५ ऑक्टोबर २०२६


# आयुष्य... हातातून निसटून गेलेल्या वाळूसारखं

आयुष्य म्हणजे नेमकं काय, हा प्रश्न माणूस इतरांना विचारत नाही; तो एक दिवस स्वतःलाच विचारतो. बालपणात आयुष्य खूप मोठं वाटतं, तरुणपणी ते जिंकण्याची घाई असते, संसारात ते जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली धावत राहतं आणि एका वयात अचानक मागे वळून पाहताना जाणवतं की, ज्याला आपण खूप मोठा प्रवास समजत होतो, तो प्रत्यक्षात मुठीत धरलेल्या वाळूसारखा कधी निसटून गेला हे कळलंच नाही. कालपर्यंत ज्यांच्यासोबत आपण हसत होतो, त्यातील काही चेहरे आज फक्त आठवणीत उरलेले असतात; कालपर्यंत ज्यांच्यासाठी आपण वेळ काढू शकलो नाही, त्यांच्यासाठी आज मनात हजारो शब्द असतात; कालपर्यंत उद्याची स्वप्ने पाहण्यात आपण इतके गुंतलेलो असतो की आजचा दिवस आपल्या हातातून निघून जातो. आयुष्याची हीच सर्वात मोठी गंमत आणि कदाचित सर्वात मोठी शोकांतिका आहे आपण जगण्यासाठी सतत धावत राहतो आणि धावताना जगणंच विसरून जातो.आयुष्य म्हणजे फक्त जन्म आणि मृत्यू यांच्या मधला काळ नाही. जन्म आपल्याला मिळतो, मृत्यू आपल्याला गाठतो; पण या दोन्हींच्या मध्ये आपण काय करतो, कोणासाठी जगतो, कोणाला प्रेम देतो, कोणाच्या अश्रूंना हात लावतो, कोणाच्या दुःखात शांतपणे उभे राहतो, कोणाला क्षमा करतो, कोणाची माफी मागतो आणि आपल्या जाण्यानंतर आपल्या नावापेक्षा आपल्या आठवणी किती काळ जिवंत राहतात यातून आयुष्याची खरी ओळख निर्माण होते. आपण किती वर्षे जगलो याची नोंद कॅलेंडर ठेवते पण आपण कसे जगलो याची नोंद माणसांच्या मनात होते. म्हणूनच आयुष्याची लांबी महत्त्वाची नसते, त्याची खोली महत्त्वाची असते. श्वासांची संख्या महत्त्वाची नसते, त्या श्वासांमध्ये किती प्रेम होते हे महत्त्वाचे असते. लहानपणी आपल्याला वाटतं, मोठं झाल्यावर सगळं आपल्या मनासारखं होईल. शाळा संपेल, नोकरी मिळेल, पैसा येईल, घर होईल, संसार होईल, मुलं मोठी होतील आणि मग आपण सुखाने जगू. पण आयुष्य कधीच एका ठिकाणी थांबत नाही. एक इच्छा पूर्ण होते आणि तिच्या मागे दुसरी इच्छा उभी राहते. एक समस्या सुटते आणि दुसरी दारात येऊन उभी राहते. आपण म्हणतो, "हे एकदा झालं की मी शांत बसेन," पण ते "एकदा" कधीच येत नाही. आयुष्य सतत पुढे ढकलत राहते आणि आपण सुखाला भविष्यकाळात ठेवत राहतो. आजचा आनंद उद्यावर ढकलतो, आजची भेट पुढच्या आठवड्यावर ढकलतो, आजचे प्रेम व्यक्त करणे "नंतर"वर ठेवतो आणि मग एक दिवस लक्षात येतं की आपल्याकडे आठवणी तर खूप आहेत, पण जगलेले क्षण फारच कमी आहेत.आयुष्य नदीसारखं असतं. त्याला सरळ रस्ता नसतो. कधी प्रवाह शांत असतो, कधी पाण्याला वेग असतो, कधी खडक आडवे येतात, कधी काठ तुटतात, कधी पूर येतो आणि कधी नदी इतकी शांत वाहते की तिच्या प्रवासाचा आवाजही ऐकू येत नाही. पण नदी एक गोष्ट शिकवते वाट अडली म्हणून प्रवाह थांबवायचा नसतो; वाट बदलायची असते. माणसाचं आयुष्यही असंच आहे. काही स्वप्नं तुटतील, काही माणसं दूर जातील, काही नाती संपतील, काही अपेक्षा अपूर्ण राहतील, काही वेळा आपल्या प्रामाणिकपणाचाच गैरफायदा घेतला जाईल, काही वेळा आपण योग्य असूनही दोषी ठरू; म्हणून आयुष्य थांबत नाही. सूर्य रोज उगवतो, जरी कालचा दिवस कितीही काळोखाचा असला तरी पहाटेला कालच्या रात्रीची भीती नसते. तसेच माणसानेही कालच्या दुःखाला आजच्या आयुष्यावर राज्य करू देऊ नये.आपल्या आयुष्यातील सर्वात मोठी चूक कदाचित हीच असते की आपण भूतकाळात राहतो किंवा भविष्याची चिंता करतो. जे घडून गेले ते बदलता येत नाही आणि जे अजून घडलेलेच नाही त्याची चिंता करून आजचा क्षण का जाळायचा? काही आठवणी आयुष्यभर छळतील, काही चुका मनात पुन्हा पुन्हा उभ्या राहतील, काही माणसांनी दिलेल्या जखमा सहज भरून येणार नाहीत; पण जखम कायम ठेवणे आणि तिच्यापासून शिकणे यात फरक आहे. भूतकाळाकडे मागे वळून पाहा, पण तिथेच अडकून राहू नका. कारण मागे वळून चालणारा माणूस पुढे जाऊ शकत नाही. आयुष्य पुढे जाण्याचे नाव आहे. कधी हळू, कधी थकून, कधी रडत, कधी एकटं काही नाती संपतात म्हणून आयुष्य संपत नाही उलट काही नाती संपल्यानंतरच स्वतःशी असलेलं नातं पुन्हा निर्माण होतं.आयुष्य आपल्याला हळूहळू एक सत्य शिकवतं प्रत्येकाला खुश ठेवणं शक्य नाही. आपण कितीही चांगलं वागलो तरी कोणीतरी गैरसमज करेल. आपण कितीही प्रामाणिक राहिलो तरी कोणीतरी संशय घेईल. आपण कोणासाठी कितीही केलं तरी कदाचित त्याला ते कमीच वाटेल. सुरुवातीला याचा त्रास होतो. मन प्रश्न विचारत राहतं "मी काय चुकलो?" पण हळूहळू समजतं की प्रत्येक माणसाच्या नजरेत आपली प्रतिमा सारखी असू शकत नाही. म्हणून लोकांच्या मतांपेक्षा आपल्या अंतःकरणाचा आवाज महत्त्वाचा असतो. आपण स्वतःच्या मनाला उत्तर देऊ शकत असू, तर प्रत्येक आरोपाला उत्तर देण्याची गरज नसते.आयुष्य म्हणजे स्वतःशी केलेली सर्वात मोठी भेट आहे. आपण जग जिंकण्याचा प्रयत्न करतो; पण स्वतःच्या मनात शांतता निर्माण करण्यासाठी मात्र फार कमी प्रयत्न करतो. बाहेर कितीही संपत्ती असली, कितीही लोक आपल्या आसपास असले, कितीही मोठं घर असलं तरी मन रिकामं असेल तर त्या वैभवाला अर्थ उरत नाही. आणि उलट, साध्या घरात राहणारा, कमी साधनांमध्ये जगणारा माणूस जर रात्री शांत झोपू शकत असेल, त्याच्या मनात कुणाबद्दल द्वेष नसेल आणि सकाळी उठताना त्याला आपल्या आयुष्याबद्दल कृतज्ञता वाटत असेल, तर त्याच्यापेक्षा श्रीमंत माणूस दुसरा कोण? शांत मन ही आयुष्यातली सर्वात मोठी संपत्ती आहे.कधी कधी आयुष्य आपल्याला एवढं थकवतं की आपण स्वतःलाच विचारतो "आता आणखी किती?" बाहेरून आपण हसत असतो, लोकांशी बोलत असतो, आपली कामं करत असतो; पण आत कुठेतरी एक माणूस शांतपणे रडत असतो. प्रत्येकाच्या चेहऱ्यामागे एक न सांगितलेली कथा असते. कुणी आर्थिक संकटाशी लढत असतो, कुणी नातं तुटल्याचं दुःख घेऊन जगत असतो, कुणी आपल्या माणसाला गमावलेलं असतं, कुणी अपमान गिळून जगत असतो, तर कुणी स्वतःच्या मनाशीच रोज युद्ध करत असतो. म्हणून एखाद्याच्या हसण्यावरून त्याचं आयुष्य सुखी आहे असं समजू नका. काही लोकांच्या ओठांवर हसू असतं, पण डोळ्यांच्या मागे समुद्र दडलेला असतो.म्हणून माणसांशी जरा प्रेमाने वागा. एखाद्याला कमी लेखण्यापूर्वी त्याने कोणत्या परिस्थितीतून प्रवास केला आहे, हे जाणून घ्या. कुणाच्या चुका मोजण्यापूर्वी त्याच्या जखमा समजून घ्या. कुणाला दोष देण्यापूर्वी त्याच्या आयुष्यातला अंधार पाहण्याचा प्रयत्न करा. कारण प्रत्येक माणूस काहीतरी लढत असतो. काहींच्या लढाया दिसतात, काहींच्या दिसत नाहीत. जगात प्रत्येकाला थोड्या पैशापेक्षा, थोड्या प्रसिद्धीपेक्षा आणि थोड्या यशापेक्षा अधिक गरज असते ती समजून घेणाऱ्या एका व्यक्तीची.आयुष्याचा आणखी एक कठोर धडा म्हणजे—काही गोष्टी आपल्या हातात नसतात. आपण कितीही प्रेम केलं तरी एखादं नातं वाचेलच असं नाही.आपण कितीही काळजी घेतली तरी प्रत्येक संकट टाळता येत नाही. आपण कितीही मेहनत केली तरी प्रत्येक वेळी यश मिळेलच असं नाही. आपण कितीही चांगले असलो तरी प्रत्येकजण आपल्याशी चांगलाच वागेल असं नाही. या सत्याचा स्वीकार करायला माणसाला अनेक वर्षे लागतात.पण एकदा हा स्वीकार झाला की मनावरचं ओझं हलकं होतं. कारण आयुष्य बदलण्यापेक्षा काही वेळा परिस्थिती स्वीकारून त्यात स्वतःला सावरता येणं हीच खरी ताकद असते.आयुष्य आपल्याला तोडतंही आणि घडवतंही. संकटं आपल्याला शिक्षा देण्यासाठी येत नाहीत; अनेकदा ती आपल्याला आपली खरी ताकद दाखवण्यासाठी येतात. अग्नीमध्ये गेल्याशिवाय सोन्याला त्याची चमक मिळत नाही. तसंच दुःखातून गेल्याशिवाय माणसाला स्वतःची खोली कळत नाही. काही वेदना आपल्याला अधिक संवेदनशील करतात. काही अपयश आपल्याला नम्र करतात. काही विश्वासघात आपल्याला माणसं ओळखायला शिकवतात. काही एकटेपणा आपल्याला स्वतःची सोबत करायला शिकवतो. म्हणून प्रत्येक दुःखाला शत्रू समजू नका. काही दुःखं आयुष्याची कठोर पण आवश्यक शिक्षक असतात.आणि मग एक दिवस आपण थांबतो... मागे वळून पाहतो... आणि लक्षात येतं की आपण ज्या गोष्टींसाठी किती वर्षे धावलो, त्यातील कितीतरी गोष्टी आज आपल्या हातात असूनही त्यांचा आनंद घेण्यासाठी मन उरलेलं नाही. आपण पैसा कमावला, पण वेळ गमावला. आपण घर मोठं केलं, पण त्यातले संवाद छोटे झाले. आपण जगाशी संपर्क वाढवला, पण स्वतःच्या माणसांशी अंतर वाढलं. आपण भविष्य सुरक्षित करण्याच्या प्रयत्नात वर्तमान असुरक्षित करून टाकलं. आपण मुलांसाठी, कुटुंबासाठी, प्रतिष्ठेसाठी, समाजासाठी, नोकरीसाठी, व्यवसायासाठी धावत राहिलो; पण कधी स्वतःला विचारलं का "मी स्वतःसाठी शेवटचा कधी जगलो?"कधी एखाद्या सकाळी चहाचा कप हातात घेऊन फक्त शांत बसून पहा. कोणतीही घाई नको. कोणतीही अपेक्षा नको. फोन बाजूला ठेवा. जगाला काही सिद्ध करण्याची गरज नाही, असं स्वतःला एकदा सांगा. कदाचित त्या शांत क्षणात जाणवेल की आनंद फार मोठ्या गोष्टीत नसतो. तो एखाद्या जुन्या गाण्यात असतो, एखाद्या परिचित आवाजात असतो, पावसाच्या वासात असतो, एखाद्या जुन्या आठवणीत असतो, कुणीतरी मनापासून विचारलेल्या "कसा आहेस?" या चार शब्दांत असतो. आयुष्य सुंदर करण्यासाठी नेहमी मोठ्या घटना घडण्याची गरज नसते; लहान क्षणांना मनापासून जगण्याची गरज असते.आपण अनेकदा म्हणतो, "माझ्याकडे वेळ नाही." पण वेळ नसतो की प्राधान्य नसते? ज्याच्यावर प्रेम असतं त्याच्यासाठी आपण वेळ काढतो. ज्याची काळजी असते त्याला फोन करतो. ज्याची आठवण येते त्याला भेटायला जातो. म्हणून आयुष्याच्या शेवटी "वेळ नव्हता" हा बहाणा स्वतःलाच पटत नाही. कारण वेळ सगळ्यांकडे सारखाच असतो फरक एवढाच असतो की आपण तो कुठे खर्च केला. पैसा खर्च केल्यावर पुन्हा मिळवता येतो, पण एकदा खर्च झालेला वेळ जगातील कोणतीही शक्ती परत आणू शकत नाही.आयुष्याच्या वाटेवर काही क्षण असे येतात की आपण स्वतःलाच हरवून बसतो. आपण कोण आहोत, काय हवं आहे, कुठे चाललो आहोत, याची उत्तरे सापडत नाहीत. अशा वेळी थांबायला घाबरू नका. प्रत्येक थांबा म्हणजे पराभव नसतो. कधी कधी थांबणं म्हणजे पुन्हा योग्य दिशेने चालण्यासाठी घेतलेला श्वास असतो. जग सतत धावायला सांगतं; पण आयुष्य कधी कधी हळू चालायला सांगतं. कारण धावताना आपण रस्त्यावरची फुलं पाहत नाही, माणसांचे चेहरे पाहत नाही, आकाशाकडे पाहत नाही आणि स्वतःच्या मनाचा आवाजही ऐकत नाही.आयुष्याच्या शेवटी माणूस बहुधा केलेल्या चुका आठवतो, पण त्याहून जास्त न केलेल्या गोष्टींची खंत करतो. म्हणून आज जे सांगायचं आहे ते आजच सांगा. ज्याची माफी मागायची आहे ती आजच मागा. ज्याच्यावर प्रेम आहे त्याला आजच सांगा. ज्याच्याशी गैरसमज झाला आहे त्याच्याशी आजच बोला. कारण उद्या हा शब्द आयुष्याच्या शब्दकोशातील सर्वात धोकादायक शब्द आहे.एक दिवस आपल्याकडे सगळं असेल पण वेळ नसेल. एक दिवस आपल्या घरात सगळ्या वस्तू असतील पण त्या वस्तूंचा आनंद घेणारे काही चेहरे नसतील. एक दिवस फोनमध्ये हजारो नंबर असतील पण एखादा खास नंबर कायमचा शांत झालेला असेल. एक दिवस आपल्या कपाटात कपडे असतील पण त्यांना घालून कुठे जायचं हे उरलेलं नसेल. एक दिवस आपल्या घरात आठवणी असतील पण त्या आठवणींमधली माणसं नसतील. तेव्हा कळेल की आपण आयुष्यभर ज्या गोष्टी जमा केल्या, त्यापेक्षा ज्या क्षणांना जगलो ते किती मौल्यवान होते.म्हणून आयुष्याला उद्याच्या हिशेबात मोजू नका. आजचा दिवस जर तुमच्याकडे आहे, तर तो अपूर्ण ठेवू नका. आयुष्य म्हणजे फक्त सुख नाही आणि फक्त दुःखही नाही. ते दोन्हींचं अद्भुत मिश्रण आहे. एकटेपणा नसता तर सोबतीची किंमत कळली नसती. म्हणून आयुष्याने दिलेल्या प्रत्येक अनुभवाला स्वीकारा. काही क्षण हसवत असतील, काही रडवत असतील; पण दोन्ही मिळूनच तुमची कथा तयार होत असते.आणि कदाचित आयुष्याचं सर्वात मोठं सत्य हेच आहे की आपल्याला वाटतं आपण आयुष्य जगत आहोत; प्रत्यक्षात आयुष्य आपल्याला जगायला शिकवत असतं. प्रत्येक दिवस एक शिक्षक आहे. प्रत्येक माणूस एक धडा आहे. प्रत्येक चूक एक पुस्तक आहे. प्रत्येक दुःख एक परीक्षा आहे. प्रत्येक आनंद एक पुरस्कार आहे. आणि प्रत्येक निरोप आपल्याला अनित्यतेची जाणीव करून देतो. काल जो क्षण होता तो आज आठवण झाला आहे आणि आजचा क्षण उद्या आठवण होणार आहे. म्हणून वर्तमानाला हातातून निसटू देऊ नका.एक दिवस असा येईल की धावपळ थांबेल. फोन वाजणार नाही. कोणतीही बैठक नसेल. कोणतीही घाई नसेल. कोणतीही स्पर्धा नसेल. कोणाला काही सिद्ध करायचे नसेल. फक्त मागे वळून पाहायचे असेल. त्या वेळी आपल्या हातात पैसा असेल की नाही, पद असेल की नाही, यापेक्षा मनात समाधान असेल का, हा प्रश्न मोठा असेल. कारण शेवटी माणूस रिकाम्या हातानेच जातो. ज्यासाठी आयुष्यभर धावलो ते सगळं इथेच राहून जातं. पण माणूस निघून जातो. त्याच्यासोबत फक्त दोन गोष्टी जातात त्याने जगलेलं आयुष्य आणि त्याच्या मनात साठवलेली माणसांची ऊब. म्हणून संपत्ती जमवा, पण त्यापेक्षा आठवणी जमा करा. घर बांधा, पण त्यापेक्षा नाती बांधा. नाव कमवा, पण त्यापेक्षा विश्वास कमवा. यश मिळवा, पण त्यापेक्षा समाधान मिळवा. जग जिंका, पण स्वतःला हरवू नका.कदाचित उद्या आपण नसू. कदाचित उद्या आपल्याला फोन करणारा कोणी नसेल. कदाचित उद्या एखादा परिचित आवाज कायमचा शांत झालेला असेल. म्हणून आजचा दिवस जगताना थोडं थांबा, आजूबाजूला पाहा आणि मनातल्या माणसांना मनापासून जवळ करा. कारण आयुष्य फार मोठं नाही. ते फक्त आपल्याला मोठं वाटतं. प्रत्यक्षात ते काही मोजक्या श्वासांचं, काही मोजक्या भेटींचं, काही मोजक्या हसण्यांचं आणि काही मोजक्या अश्रूंचं नाव आहे.*आयुष्य म्हणजे किती वर्षे जगलो हे नाही; त्या वर्षांत किती माणूस राहिलो हे आहे. आयुष्य म्हणजे किती कमावलं हे नाही; किती वाटलं हे आहे. आयुष्य म्हणजे किती लोक आपल्या मागे चालले हे नाही; आपण किती लोकांच्या दुःखात त्यांच्या सोबत चाललो हे आहे. आयुष्य म्हणजे जगाने आपल्याला किती लक्षात ठेवलं हे नाही; आपण कोणाच्या मनात इतकी जागा केली की आपल्या अनुपस्थितीतही त्या माणसाच्या डोळ्यात पाणी आलं हे आहे.*आणि शेवटी जेव्हा या सगळ्या प्रवासाकडे मागे वळून पाहाल, तेव्हा कदाचित लक्षात येईल—आपण मोठं होण्यासाठी खूप धावलो, पण आनंदासाठी थांबलोच नाही; आपण भविष्य सुरक्षित करण्यासाठी वर्तमान गमावलं, आपण जगाला आपली किंमत सिद्ध करण्यात आयुष्य घालवलं, पण स्वतःला प्रेम करण्यास वेळ दिला नाही. म्हणून अजून वेळ आहे तोपर्यंत जगा. मनापासून जगा. चुकलात तर पुन्हा उभे राहा. रडा अश्रूंना वाहू द्या आणि कुणी प्रेम दिलं तर ते प्रेम आयुष्यभर जपून ठेवा.कारण एक दिवस आयुष्याचा शेवटचा सूर्यास्त समोर उभा राहील... त्या क्षणी हातात काहीही धरता येणार नाही. ना पैसा, ना पद, ना अहंकार, ना प्रसिद्धी. फक्त आठवणींची एक छोटीशी पेटी उरेल. त्या पेटीत काही हसरे चेहरे असतील, काही डोळ्यांतले अश्रू असतील, काही अपूर्ण संवाद असतील, काही माफ न केलेल्या चुका असतील, काही दिलेली प्रेमाची वचने असतील आणि काही क्षण असतील—ज्यांना आपण त्या वेळी साधं समजलो होतो, पण नंतर कळलं की *तेच आपल्या आयुष्यातले सर्वात मौल्यवान क्षण होते.*म्हणून आयुष्याला फक्त जगू नका... *अनुभवा.* माणसांना फक्त भेटू नका... *जपा.* नाती फक्त टिकवू नका... मनापासून जगा. क्षण फक्त येऊ देऊ नका... त्यांना आठवण बनवा. आणि जेव्हा एक दिवस या जगातून निघण्याची वेळ येईल, तेव्हा मागे वळून पाहताना मनात एकच समाधान असावं—"मी खूप मोठा माणूस झालो की नाही, हे मला माहीत नाही... पण मी माणूस म्हणून जगण्याचा प्रयत्न मात्र मनापासून केला."कदाचित हाच आयुष्याचा खरा अर्थ आहे.




प्रा.डॉ. सतिश लिला नामदेव दोडके

ठाणे

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०५ ऑक्टोबर २०२६

# शिक्षक : समाजाच्या भविष्याचा शिल्पकार

५ ऑक्टोबर हा दिवस जगभरात ‘जागतिक शिक्षक दिन’ म्हणून साजरा केला जातो. शिक्षणाच्या क्षेत्रात शिक्षकांचे असलेले अनन्यसाधारण योगदान अधोरेखित करण्याबरोबरच शिक्षकांच्या प्रतिष्ठेचा, त्यांच्या कार्यपरिस्थितीचा, शिक्षणाच्या गुणवत्तेचा आणि भावी पिढीच्या जडणघडणीचा गांभीर्याने विचार करण्याचा हा दिवस आहे. शिक्षक म्हणजे केवळ पाठ्यपुस्तकातील धडे शिकविणारी व्यक्ती नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा, त्याच्या विचारांना दिशा देणारा आणि समाजाच्या भविष्यातील नागरिकांची निर्मिती करणारा महत्त्वाचा घटक होय. एका शिक्षकाच्या कार्याचा परिणाम एका वर्गापुरता किंवा एका शैक्षणिक वर्षापुरता मर्यादित राहत नाही. त्याच्या शिकवणीचा प्रभाव विद्यार्थ्यांच्या संपूर्ण आयुष्यावर आणि त्यामार्फत कुटुंब, समाज व राष्ट्राच्या विकासावर पडत असतो. म्हणूनच शिक्षकाचा सन्मान हा केवळ एका व्यवसायाचा सन्मान नसून ज्ञान, शिक्षण, संस्कार आणि सामाजिक परिवर्तनाच्या शक्तीचा सन्मान आहे.जागतिक शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांच्या कार्याचा विचार करताना शिक्षणाचा व्यापक अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. शिक्षण म्हणजे केवळ वाचन, लेखन, गणित किंवा विविध विषयांचे ज्ञान आत्मसात करणे नव्हे. शिक्षण व्यक्तीला स्वतःचा विचार करण्याची, योग्य-अयोग्य यातील फरक ओळखण्याची, प्रश्न विचारण्याची, निर्णय घेण्याची आणि समाजाप्रती जबाबदारी स्वीकारण्याची क्षमता देते. या प्रक्रियेत शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. विद्यार्थी किती माहिती लक्षात ठेवतो यापेक्षा तो मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग जीवनात कसा करतो, समस्या कशा सोडवतो, इतरांशी कसा वागतो आणि समाजाच्या हितासाठी काय योगदान देतो, याला आज अधिक महत्त्व आहे. त्यामुळे शिक्षक हा ज्ञानाचा केवळ प्रसारक न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा मार्गदर्शक बनला पाहिजे.भारतीय समाजात शिक्षकाला ऐतिहासिकदृष्ट्या विशेष स्थान प्राप्त झाले आहे. गुरु-शिष्य परंपरेपासून आधुनिक शिक्षणव्यवस्थेपर्यंत शिक्षकाची भूमिका सातत्याने बदलत आली आहे. पूर्वी शिक्षकाकडे ज्ञानाचा प्रमुख स्रोत म्हणून पाहिले जात होते. विद्यार्थी ज्ञान मिळविण्यासाठी शिक्षकाकडे जात असे. आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे ज्ञानाचे अनेक स्रोत विद्यार्थ्यांच्या हातात आले आहेत. भ्रमणध्वनी, संगणक, इंटरनेट, डिजिटल ग्रंथालये, ऑनलाइन अभ्यासक्रम आणि विविध शैक्षणिक व्यासपीठांमुळे काही क्षणांत प्रचंड माहिती उपलब्ध होते. अशा परिस्थितीत शिक्षकाची गरज संपली नसून त्याची भूमिका अधिक व्यापक झाली आहे. माहिती आणि ज्ञान यांतील फरक विद्यार्थ्याला समजावून सांगणे, उपलब्ध माहितीची सत्यता तपासण्याची सवय लावणे आणि ज्ञानाचा विवेकपूर्ण उपयोग करण्यास प्रवृत्त करणे हे आजच्या शिक्षकाचे महत्त्वाचे कार्य आहे.तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकासमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे बदलत्या साधनांशी स्वतःला सतत अद्ययावत ठेवणे. डिजिटल शिक्षणामुळे वर्गखोलीची पारंपरिक सीमा विस्तारली आहे. प्रत्यक्ष वर्गाबरोबर ऑनलाइन अध्यापन, ध्वनिचित्रफिती, आंतरक्रियात्मक सामग्री, आभासी प्रयोगशाळा आणि डिजिटल मूल्यमापनाच्या पद्धती वापरल्या जात आहेत. मात्र तंत्रज्ञानाचा वापर हा शिक्षणाचा उद्देश नसून शिक्षण अधिक परिणामकारक करण्याचे साधन आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान विद्यार्थ्याला माहिती देऊ शकते; परंतु त्याला संवेदनशील, जबाबदार आणि विवेकी नागरिक बनविण्याचे कार्य मानवी शिक्षकच प्रभावीपणे करू शकतो. विद्यार्थ्यांच्या मनातील संभ्रम ओळखणे, त्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे, अपयशातून पुन्हा उभे राहण्याची प्रेरणा देणे आणि त्याला माणुसकीची जाणीव करून देणे या गोष्टी कोणतेही तंत्रज्ञान पूर्णपणे करू शकत नाही.कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे शिक्षणक्षेत्रासमोर नवे प्रश्न उभे राहिले आहेत. विद्यार्थ्यांना लेखन, माहिती संकलन, भाषांतर, गणना आणि विविध शैक्षणिक कामांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची साधने सहज उपलब्ध होत आहेत. या बदलाकडे केवळ धोका म्हणून पाहण्याऐवजी त्याचा जबाबदारीने वापर कसा करायचा, हे विद्यार्थ्यांना शिकविण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांची स्वतः विचार करण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि चिकित्सक दृष्टी कमी होणार नाही, याची काळजी शिक्षकाने घेतली पाहिजे. तयार उत्तर स्वीकारण्यापेक्षा प्रश्न समजून घेणे, उपलब्ध उत्तरांची चिकित्सा करणे आणि स्वतःचे स्वतंत्र मत विकसित करणे याला शिक्षणात महत्त्व दिले पाहिजे. त्यामुळे भविष्यातील शिक्षक हा तंत्रज्ञानविरोधी नसून तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करणारा आणि विद्यार्थ्यांना त्याचे नैतिक भान देणारा असणे आवश्यक आहे.शिक्षणाचे आणखी एक महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे मूल्यांची जडणघडण. ज्ञान आणि कौशल्ये आवश्यक असली तरी त्यांना नैतिक मूल्यांची जोड नसेल तर शिक्षण अपूर्ण राहते. समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, सहिष्णुता, सामाजिक संवेदनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवी प्रतिष्ठेचा आदर ही मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणे आवश्यक आहे. समाजात विविध जाती, धर्म, भाषा, प्रदेश, आर्थिक स्तर आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेले लोक एकत्र राहतात. या विविधतेचा आदर करत सहजीवनाची भावना निर्माण करणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. शिक्षक स्वतः आपल्या वर्तनातून समानता आणि सहिष्णुतेचा आदर्श निर्माण करत असेल, तर त्याचा विद्यार्थ्यांवर अधिक प्रभाव पडतो. कारण विद्यार्थ्यांना शिक्षकाचे बोलणे जितके महत्त्वाचे वाटते, तितकेच त्याचे आचरणही महत्त्वाचे वाटते.सामाजिक विषमता कमी करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी साधन आहे. मात्र शिक्षणव्यवस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना समान संधी मिळतेच असे नाही. ग्रामीण, आदिवासी, भटक्या-विमुक्त, आर्थिकदृष्ट्या दुर्बल, दिव्यांग आणि विविध कारणांमुळे वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसमोर अनेक अडचणी असतात. अशा विद्यार्थ्यांच्या गरजा समजून घेऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षकाने संवेदनशील भूमिका बजावली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीवरून त्याच्या क्षमतेचा अंदाज बांधणे किंवा त्याला कमी लेखणे हे शिक्षणाच्या मूलभूत तत्त्वांना विरोधी आहे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही क्षमता असते. त्या क्षमतेला योग्य दिशा देणे आणि आत्मविश्वास निर्माण करणे हे शिक्षकाचे खरे कौशल्य आहे.विशेषतः ग्रामीण भागातील शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक ग्रामीण आणि दुर्गम भागांत आजही शैक्षणिक साधनसुविधा, डिजिटल सुविधा, वाहतूक आणि इतर पायाभूत सोयींच्या मर्यादा आहेत. काही विद्यार्थ्यांना कौटुंबिक आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण सोडावे लागते, तर काही विद्यार्थ्यांवर घरकाम, शेती किंवा इतर जबाबदाऱ्यांचा भार असतो. अशा परिस्थितीत शिक्षक केवळ अध्यापन करणारा राहत नाही; तो विद्यार्थ्यांच्या कुटुंबाशी संवाद साधणारा, पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारा आणि विद्यार्थ्याला शिक्षणात टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणारा सामाजिक घटक बनतो. ग्रामीण समाजाच्या परिवर्तनात शिक्षकाचे योगदान त्यामुळे विशेष अधोरेखित होते.मुलींच्या शिक्षणाच्या संदर्भातही शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या सामाजिक मानसिकतेविरुद्ध जनजागृती करण्याचे काम शिक्षक करू शकतो. मुलींच्या शिक्षणामुळे केवळ एका व्यक्तीचा विकास होत नाही, तर संपूर्ण कुटुंबाच्या आणि पुढील पिढ्यांच्या जीवनमानावर त्याचा परिणाम होतो. शिक्षित मुलगी स्वतःचे निर्णय अधिक सक्षमपणे घेऊ शकते, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याची संधी मिळवू शकते आणि सामाजिक प्रश्नांबाबत अधिक जागरूक होऊ शकते. त्यामुळे शिक्षकाने वर्गातील प्रत्येक मुलगा आणि मुलगी यांच्याकडे समान क्षमतेच्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. लिंगभेदमुक्त शिक्षण ही समताधिष्ठित समाजनिर्मितीची पूर्वअट आहे.आजच्या विद्यार्थ्यांसमोर मानसिक ताणाचे प्रश्नही वाढत आहेत. परीक्षेतील स्पर्धा, गुणांची अपेक्षा, करिअरची चिंता, कौटुंबिक परिस्थिती, सामाजिक माध्यमांचा प्रभाव आणि भविष्यातील अनिश्चितता यामुळे विद्यार्थ्यांच्या भावनिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या गुणांपेक्षा त्याच्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, त्याच्या अडचणी समजून घेणे आणि गरजेनुसार योग्य मार्गदर्शन करणे हे शिक्षकाच्या कार्याचा महत्त्वाचा भाग बनत आहे. प्रत्येक विद्यार्थी सारख्याच पद्धतीने शिकत नाही आणि प्रत्येकाचे यशही एकाच मापाने मोजता येत नाही. विद्यार्थ्यांच्या क्षमतेचा शोध घेऊन त्याला योग्य संधी देणे ही शिक्षणाची खरी कसोटी आहे.शिक्षकाच्या कार्याचा विचार करताना त्याच्या स्वतःच्या कार्यपरिस्थितीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. शिक्षकाकडून गुणवत्तापूर्ण अध्यापनाची अपेक्षा करताना त्याला आवश्यक शैक्षणिक साधने, प्रशिक्षण, तंत्रज्ञान, वेळ आणि शैक्षणिक स्वायत्तता मिळणे आवश्यक आहे. सतत बदलणारा अभ्यासक्रम, विविध शैक्षणिक उपक्रम, प्रशासकीय कामकाज आणि तंत्रज्ञानातील बदल यामुळे शिक्षकावर अतिरिक्त जबाबदाऱ्या येतात. शिक्षकाचा वेळ मुख्यतः विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी आणि शैक्षणिक विकासासाठी वापरला गेला पाहिजे. शिक्षकाला सन्मानाची आणि विश्वासाची वागणूक मिळाली तर त्याच्या सर्जनशीलतेला चालना मिळते. शिक्षकाचा दर्जा उंचावणे म्हणजे शिक्षणाचा दर्जा उंचावणे होय.शिक्षकाने स्वतःही आयुष्यभर विद्यार्थी राहण्याची तयारी ठेवली पाहिजे. जग सतत बदलत आहे. नवीन ज्ञान, नवीन तंत्रज्ञान, नवीन सामाजिक प्रश्न आणि नवीन अध्यापनपद्धती सातत्याने पुढे येत आहेत. त्यामुळे एकदा शिक्षण पूर्ण केले की शिक्षकाचे शिकणे संपते, अशी कल्पना कालबाह्य झाली आहे. शिक्षकाने वाचन, संशोधन, प्रशिक्षण, चर्चासत्रे आणि अनुभवांच्या देवाणघेवाणीतून स्वतःचे ज्ञान सतत समृद्ध केले पाहिजे. स्वतः शिकणारा शिक्षकच विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची जिज्ञासा निर्माण करू शकतो. शिक्षण ही स्थिर प्रक्रिया नसून सतत विकसित होणारी प्रक्रिया आहे, याची जाणीव शिक्षक आणि शिक्षणव्यवस्था या दोघांनाही असणे आवश्यक आहे.पर्यावरणीय संकटांच्या काळात शिक्षकाची सामाजिक जबाबदारी आणखी वाढली आहे. हवामानबदल, पाण्याची कमतरता, प्रदूषण, जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास यांसारख्या प्रश्नांचा परिणाम भावी पिढ्यांवर होणार आहे. विद्यार्थ्यांना पर्यावरणाविषयी केवळ पुस्तकातील माहिती देणे पुरेसे नाही; पर्यावरणपूरक जीवनशैलीची सवय लावणे आवश्यक आहे. पाणी वाचविणे, ऊर्जा बचत करणे, वृक्षसंवर्धन करणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा विवेकपूर्ण वापर करणे या सवयी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजात रुजविता येतात. अशा प्रकारे शिक्षक वर्गखोलीच्या पलीकडे जाऊन सामाजिक आणि पर्यावरणीय परिवर्तनाचा वाहक बनतो.शिक्षक हा लोकशाही समाजाच्या निर्मितीतही महत्त्वाची भूमिका बजावतो. लोकशाही केवळ मतदानाची व्यवस्था नसून विचारस्वातंत्र्य, मतभिन्नतेचा आदर, संवाद, समानता आणि जबाबदारी यांवर आधारित जीवनपद्धती आहे. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची, आपले मत मांडण्याची आणि दुसऱ्याचे मत ऐकण्याची संधी देणारी वर्गखोली ही लोकशाही संस्कारांची पहिली प्रयोगशाळा ठरू शकते. शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना प्रोत्साहन दिले आणि मतभिन्नतेचा आदर केला तर त्यातून चिकित्सक आणि जबाबदार नागरिक घडू शकतात. समाजात वाढणाऱ्या असहिष्णुतेला उत्तर देण्यासाठी विवेकशील आणि संवादक्षम पिढी निर्माण करणे ही आजची मोठी गरज आहे.खऱ्या अर्थाने शिक्षकाचा प्रभाव त्याने किती धडे शिकविले यापेक्षा त्याने किती विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला यावर मोजला पाहिजे. एखाद्या विद्यार्थ्याला स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवायला शिकविणे, अपयशानंतर पुन्हा प्रयत्न करण्याची प्रेरणा देणे, चुकीतून शिकण्याची तयारी निर्माण करणे किंवा समाजातील इतरांविषयी संवेदनशीलता निर्माण करणे ही शिक्षकाच्या कार्याची मोठी फलश्रुती आहे. शिक्षकाचे एखादे वाक्य, एखादा सल्ला किंवा एखाद्या क्षणी दिलेला आधार विद्यार्थ्यांच्या संपूर्ण आयुष्याला दिशा देऊ शकतो. म्हणून शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून भविष्य घडविणारा व्यक्ती असतो.आज शिक्षणव्यवस्थेकडे केवळ रोजगारनिर्मितीच्या साधनाच्या दृष्टीने पाहण्यापेक्षा मानवी विकासाचे माध्यम म्हणून पाहण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये मिळाली पाहिजेत; परंतु त्याचबरोबर त्यांच्यात सामाजिक जबाबदारी, नैतिक जाणीव, सर्जनशीलता, सहकार्याची भावना आणि मानवी मूल्येही विकसित झाली पाहिजेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबर माणुसकीची प्रगतीही झाली पाहिजे. या दोन्हींचा समतोल साधण्याचे काम शिक्षक करू शकतो. म्हणूनच आधुनिक शिक्षणव्यवस्थेत शिक्षकाचे स्थान केवळ अध्यापनापुरते मर्यादित न ठेवता समाजनिर्मितीच्या व्यापक प्रक्रियेत मान्य केले पाहिजे.जागतिक शिक्षक दिन हा त्यामुळे शिक्षकांना शुभेच्छा देण्याचा केवळ औपचारिक दिवस नसून शिक्षण आणि शिक्षक यांच्या भविष्याचा विचार करण्याचा दिवस आहे. शिक्षकांचा सन्मान हा एका दिवसापुरता मर्यादित न राहता त्यांच्या कार्याला समाजात योग्य प्रतिष्ठा, शिक्षणाला आवश्यक साधने आणि विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सक्षम वातावरण निर्माण करण्यात प्रतिबिंबित झाला पाहिजे. शिक्षकांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणे, त्यांना सतत प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, नव्या तंत्रज्ञानाशी परिचित करून देणे आणि अध्यापनासाठी आवश्यक स्वायत्तता देणे ही शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी आवश्यक पावले आहेत.५ ऑक्टोबरचा जागतिक शिक्षक दिन आपल्याला हेच स्मरण करून देतो की राष्ट्राची खरी उभारणी केवळ भव्य इमारती, आधुनिक तंत्रज्ञान किंवा आर्थिक प्रगतीतून होत नाही; ती विचारशील, संवेदनशील, कर्तव्यदक्ष आणि विवेकी नागरिकांच्या निर्मितीतून होते. अशा नागरिकांच्या निर्मितीची प्रक्रिया वर्गखोलीत सुरू होते आणि तिच्या केंद्रस्थानी शिक्षक असतो. काळ बदलला, अध्यापनाची साधने बदलली, ज्ञान मिळविण्याचे मार्ग बदलले आणि तंत्रज्ञान अधिक सामर्थ्यवान झाले, तरी विद्यार्थ्याला समजून घेणारा, त्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवणारा आणि त्याला माणूस म्हणून घडविणारा शिक्षक कालातीत राहणार आहे. म्हणून शिक्षकाचा खरा सन्मान हा एका दिवसाच्या अभिनंदनात नसून प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि उज्ज्वल भविष्य देण्याच्या सामूहिक प्रयत्नांत आहे. शिक्षक हा केवळ आजचा अध्यापक नसतो; तो उद्याच्या समाजाचा शिल्पकार असतो. म्हणूनच शिक्षकाचा सन्मान म्हणजे शिक्षणाचा सन्मान आणि शिक्षणाचा सन्मान म्हणजे समाजाच्या उज्ज्वल भविष्याचा सन्मान होय.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),
ईमेल - bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०५ ऑक्टोबर २०२६

# विकास भोई समाजाचा...

भटक्या-विमुक्त जाती-जमाती NT-B प्रवर्गात येणारा हा 'भोई' समाज, या समाजाच्या विकासासाठी खालीलप्रमाणे महत्त्वाच्या घटकांची गरज आता मूलभूत गरजाएवढीच महत्त्वाची झाली आहे. भोई समाजाचे जीवन व वास्तविकता - भोई समाज जवळ-जवळ ८०% भोई समाज हा मच्छीमारी व्यवसाय करणारा समाज आहे. १०% समाज हा डांगरवाडी पिकवणारा आहे. ०८% समाज हा इतर छोटे-मोठे व्यवसाय करणारा, रोज मजुरी करणारा समाज आहे.जवळपास 2% समाज हा शिकणारा आणि शिकून सवरुन नोकरी करणारा समाज आहे. परिस्थितीच्या हिशोबाने तो शिकून आता कुठेतरी तुटक-तुटक समाजाचा व्यक्ती नोकरी करताना दिसून येऊ लागला आहे. त्याचबरोबर सोसायटीबाह्य, मच्छीमार, जो मच्छीमारी करणारा समाज आहे; तो रोजमजुरीने काम करणारा मजूरच राहिला आहे. त्याला सोसायटीवाले सोसायटीचा सदस्य करून घ्यायला तयार नाही. सोसायटीचा सदस्य त्यांनाच मिळावे ज्यांना मच्छीमारी करता येते. ज्यांचा व्यवसाय फक्त नि फक्त मासेमारी आहे. सोसायटी बाह्य मच्छीमारांना शासकीय विम्याचा लाभ मिळावा - एखादा व्यक्ती तो जातीने भोई आहे पण त्याचा स्वतःचा इतर व्यवसाय आहे. नोकरी आहे. ज्याच्या व्यवसायाचा संबंध, मच्छीमारी या व्यवसायाशी येत नाही. अशा लोकांना सोसायटी सदस्य, किंवा सोसायटीत घ्यावे किंवा घेऊ नये. मच्छीमार सोसायटीपासून, मच्छीमारी न करणाऱ्या लोकांना दूर ठेवलं तरी चालेल किंवा सोसायटीत ठेवलं तरी चालेल. त्या लोकांना सोसायटीत ठेवायचे कि नाही याबाबतचा सर्वस्व निर्णय ज्या-त्या सोसायटीचा असेल. त्याचबरोबर विशेष महत्त्वाचं ज्या लोकांचा धंदा, रोजीरोटी, प्रपंच, आणि सर्वस्व, मच्छीमारी या व्यवसायावर अवलंबून आहे. त्यांना मच्छीमारी व्यवसायाशिवाय इतर दुसरा कोणताच कामधंदा येत नाही. अशा लोकांना सोसायटीने तसेच शासनाने योग्य न्याय मिळून द्यावा. त्यांनाही जगण्याचा अधिकार मिळवून द्यावा. रोजंदारीवर ज्या मच्छीमार कामगारांकडून ( शिकाऱ्यांकडून ) त्यांना फक्त नि फक्त मजुरी देऊन त्यांच्याकडून, मासेमारी करून घेतल्या जाते. असा तो भोई ज्याची फक्त शिकारी म्हणून ओळख राहिली आहे. अशा या लोकांकडून रोजचा रोज, रोजाने काम करून घेतल्या जाते. जास्तीचा नफा, शासकीय योजनेचा लाभ, विमा योजनेचा लाभ हे सगळं मच्छीमार सोसायटीला आणि सोसायटी सदस्यांनाच मिळतो. सोसायटी बाह्य शिकारी (मासेमारी करणारा भोई समाज ) जो सोसायटी बाह्यवर्ग आहे. त्यांना शासनाच्या कोणत्याच योजनेचा लाभ घेता येत नाही. त्यांना तो मिळत नाही. शासकीय पॉलिसीचा लाभही त्यांना मिळत नाही. त्यांचा अपघाती किंवा नैसर्गिक आपत्तीत मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबाला काहीच लाभ, अर्थसाह्य मिळत नाही. तरी सर्व सोसायटीबाह्य सदस्यांच्या वतीने शासनाला माझी विनंती आपण, आपल्या वतीने संस्थेला त्याबाबत फेरबदल करण्यास सांगावे. किंवा शासनाच्या नियमात फेरबदल करून सोसायटी बाह्य मच्छीमारांसाठी स्वतंत्र योजना, विमा सुरू करावा. जे शिकारी ( मासेमारी करणारा सोसायटी बाह्य सदस्य ) त्यांना सोसायटीचा सदस्य करण्यात यावे किंवा ते मच्छीमार सोसायटी अंतर्गत सोसायटीत शिकारी म्हणून मच्छीमारी करतात. असे विश्वासनीय पत्र सोसायट्यांनी, सोसायटीच्या लेटर पॅडवर लिहून दिल्यास, शासनाला सादर केल्यास ते पत्र शासनाने मान्य करून त्यानुसार सोसायटी बाह्य मच्छीमाराचा विमा काढण्यात यावा. शासन जे-जे लाभ सोसायटी सदस्यांना देते. ते-ते लाभ सोसायटी बाह्य मच्छीमारी करणाऱ्या वर्गाला मिळाला हवा. सोसायटी बाह्य मच्छीमारांची काढलेल्या पॉलिसीला मॅच्युरिटीही असावी. उतरत्या वयातही त्या मच्छीमाराला पॉलिसीची विशिष्ट रक्कम मिळावी. तसेच काही कारणास्तव नैसर्गिक, अपघाती, नैसर्गिक आपत्तीत, सोसायटी बाह्य सदस्याचा मृत्यू झाल्यास, त्याच्या विम्याची विशिष्ट रक्कम त्यांच्या कुटुंबांना मिळावी. भोई समाजासाठी योजना राबवलेल्या योजनेचा लाभ द्यावा - १) मासेमारी व्यवसायासाठी सवलतीचे कर्ज२) मासेमारीची जाळी, होडी, इंजिन इत्यादींसाठी अनुदान३) मत्स्यविक्रेत्यांसाठी फिरता निधी४) भोई समाजातील युवकांसाठी स्वयंरोजगार कर्ज५) विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शैक्षणिक योजना६) महिला बचतगटांसाठी व्यवसाय कर्ज७) भोई समाजाच्या सहकारी संस्थांना विशेष आर्थिक सहाय्य८) पारंपरिक मासेमारी व्यवसायाचे आधुनिकीकरण भोई समाजाला पिवळे राशन कार्ड मिळावे - तळ हातावर भाकर असलेल्या या भोई समाजाला पोटभर अन्न, शासकीय योजनेचा लाभ, आरोग्य सेवा, इतर सबसिडी योजना, या सगळ्यांचा लाभ घेता यावा यासाठी भोई भटका विमुक्त समाज, यासाठी समाजाच्या प्रत्येक व्यक्तीला पिवळे राशनकार्ड / शिधापत्रिका द्यावे. मुद्रा लोन - शासनाने चालू केलेली मुद्रा लोन सुविधा फक्त आणि फक्त ज्याची चालती त्यालाच मिळती. असे न होता शासनाने सांगितलेल्या नियमाचे बँकवाले उल्लंघन करतात. ते छोट्या-छोट्या व्यवसाय करणाऱ्यांकडे करंट अकाउंट, आयटीआर, स्वतःच्या मालकी हक्काची जागा अशा गोष्टींची मागणी करतात. अगदी छोट्यातल्या छोटा व्यवसाय करायचा असल्यास व्यवसायिकाला मुद्रा लोन मिळवण्यास अधिक अडचणी येतात. बँकवाले या लोकांना सरळ-सरळ लोन देण्यास नाकारतात. रोज चक्रा मारायला लावतात. नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी, आधी असलेला छोटा व्यवसाय मोठा करण्यासाठी, मुद्रा लोनच्या स्वरूपात छोट्यात छोटी रक्कम न देता. व्यवसायाच्या हिशोबाने लहान-मोठ्या व्यवसायाला लागणारी जास्तीची मोठ्यात मोठी रक्कम, सहजपणे भोई समाजाला मिळायला हवे. खालील व्यवसाय करणाऱ्या भोई समाजाला मुद्रा लोन सहज उपलब्ध करून द्यावे. १) डांगरवाडी करणारा भोई समाज २) लाया फुटाणे विकणारा भोई समाज ३) फळ फ्रुट विकणारा भोई समाज४) भाजीपाला विकणारा भोई समाज ५) मच्छीमार करणारा भोई समाज ६) सोसायटी बाह्य मच्छिमार करणारा भोई समाज७) टरबूज-खरबूज विकणारा भोई समाज ८) शेव, चिवडा, मुरमुरे, फरसाण विकणारा भोई समाज ९) गावागावाच्या जत्रेत छोटा-मोठा व्यवसाय करणारा भोई समाज १०) छोटी-मोठी चहा, नाष्ट्याची, हॉटेल चालवणारा भोई समाज ११) छोटा-मोठं किराणा दुकान व पान टपरी चालवणारा भोई समाज १२) हातगाड्यांवर भाजलेले नरडे, फुटाणे, शेंगदाणे, सूर्यफूल, वटाणे, कुरमुरे विकणारा भोई समाज अशा छोट्या-मोठ्या व्यवसायांना वाढवण्यासाठी विना करंट अकाउंट, विना आयटीआर, कमीत कमी डॉक्युमेंटमध्ये, सहजपणे मुद्रा लोन उपलब्ध व्हावे. बँकांकडून येणाऱ्या अडचणी सहज सोप्या करण्यात याव्या. भोई समाजाच्या नावाने शैक्षणिक लोन सुविधा उपलब्ध करुन द्यावे - मोलमजुरीचे कामधंदे करून रोजी रोटी कमावणारा, पोटाच्या भाकरीसाठी रोज लढणारा, छोट्या-छोट्या व्यवसायातून उदरनिर्वाह करणारा समस्त भोई समाज हा भूमिहीन समाज आहे. त्यामुळे सातबारा हा विषय त्यांच्याकडे नाही. तारण ठेवण्यासाठी पक्के घर व इतर प्रॉपर्टीही नाही. त्यामुळे भोई समाजातील मुला-मुलींना उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक कर्जाची अडचण येऊ नये. आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार व IBA Model Education Loan Scheme अंतर्गत पात्र शिक्षण कर्जासाठी ₹ ७.५० लाखांपर्यंत सामान्यतः तारणाची आवश्यकता नसते. ₹७.५० लाखांपेक्षा जास्त शिक्षण कर्जासाठी बँकेच्या नियमानुसार योग्य तारण / सुरक्षा मागितली जाते. भोई समाज तेवढा सक्षम समाज नाही. श्रीमंत समाज नाही. समाजाच्या लोकांकडे स्वतःचं चांगल घर नाही. त्याचा धंदा, रोजमजुरीचा धंदा असून रोज कमवायचं अन् रोज खायचं अशी परिस्थिती, अशा परिस्थितीत भोई समाज पाल्य उच्च शिक्षण घेण्यास तयार होत असेल. तो शिक्षणाच्या उच्च स्तरापर्यंत कसाबसा गेला असेल किंवा उच्च शिक्षणापर्यंत जायचे असेल, MBBS सारख्या मेडिकल डिग्रीसारख्या क्षेत्रात प्रवेश घेण्यासाठी किंवा विदेशात शिकण्यासाठी लागणारा पैसा शैक्षणिक कर्जातून उपलब्ध करायचा असेल. तर त्याच्याकडे स्वतः शिवाय तारण ठेवण्यासाठी काहीच नाही. अशा वेळी त्यांना शैक्षणिक कर्ज न मिळाल्यामुळे त्याचा प्रवास त्यांचे उच्च शिक्षणाचे स्वप्न तिथेच थांबून जाते. भोई समाजाला त्याची दारिद्यी घालवायची असेल; समाज प्रगतिशील करायचा असेल तर भोई समाजाला सर्वप्रथम उच्चशिक्षित व्हावं लागेल. भोई समाजाला उच्चशिक्षित करण्यासाठी त्याच्या दरिद्री परिस्थितीवर मात करण्यासाठी सरकारने शैक्षणिक कर्जात विनातारण लोन तसेच विशेष सबसिडी असलेल्या योजनेअंतर्गत भोई समाजाच्या नव तरुण-तरुणीसाठी शैक्षणिक कर्ज सहज उपलब्ध करून द्यावे. भोई समाजाच्या नावाने घरकुल योजना उपलब्ध करून द्याव्या - भोई समाजातल्या बेघर लोकांना घरकुल योजना मिळावी. इतर जातीसारख्या त्या-त्या जातीच्या नावाने एकही योजना नाही. त्यामुळे घरकुल योजना सुरू करावी. भोई समाजासाठी भोई समाज घरकुल योजना अशी स्वतंत्र नावाने घरकुल योजना नाही. ती सुरू करावी. गावा-गावात राहणाऱ्या भोई समाजाला घरकुल योजनेसाठी डावल्या जाते. गावाच्या हिशोबाने एखादे, भोई सामाजातल्या एखाद्या व्यक्तीचे नाव घेतल्या जाते. एखाद्या दोन व्यक्तीला घरकुल योजनेचा लाभ मिळाला तर मिळाला नाहीतर तो ही मिळत नाही. असं न होता भोई समाजातल्या बेघर माणसाला या योजनेचा लाभ मिळावा. ज्याला घर नाही त्याला घर मिळावं ज्याला घर बांधण्यासाठी प्लॉट नाही त्यांना प्लॉट द्यावे. त्यावर घरकुल मंजूर करुन त्या बेरघर माणसाला त्याच्या हक्काच घर मिळावे. कॅलेंडरमध्ये भोई समाज दिवसाची नोंद करण्यात यावी- भोई समाजाच्या सन्मानाचा वर्षातून एखादा दिवस भोई समाज दिवस साजरा करण्याचा, हक्क कायदेशीर अधिकार द्यावा. भोई समाजाच्या हक्काचा, भोई समाजाच्या नावाने एक दिवसाची शासन मान्य दिवसाची मान्यता द्यावी. कॅलेंडरमध्ये भोई समाज दिवसाची नोंद करण्यात यावी. गावठाण शेती योजना - समस्त भोई समाज भूमीहीन आहे तर अशा भूमिहीन समाजाला त्याच्या पोटापाण्यासाठी, उदरनिर्वाहासाठी काही क्षेत्र गावठाणातून हक्काच्या शेतीसाठी, जमीन कसण्यासाठी उपलब्ध करून द्यावी. ज्याप्रमाणे शासनाने इतर समाजाला गावठाणातून शेती करण्यासाठी क्षेत्र उपलब्ध करून दिले. त्याचप्रमाणे भोई समाजालाही त्याच्या उपजीविकेसाठी अशा प्रकारे गावठाणातून शेतीसाठी क्षेत्र उपलब्ध करून द्यावे. भोई समाज मंगल कार्यालयाची उभारणी करण्यात यावी - भोई समाजाला त्याच्या उपस्थितीत प्रत्येक गावात मंगल कार्यालयाची गरज आहे. ज्या-ज्या गावात मोठ्या संख्येने भोई समाज उपलब्ध आहे. त्या त्या गावा-गावात भोई समाजासाठी एखादे मंगल कार्यालय शासनाच्या वतीने मंजूर करण्यात यावे. तिथे फक्त लग्नच लागणार नाही तर सामाजिक कार्यक्रम, छोटे मोठ्या कार्यक्रमासाठी , सुखदुःखासाठी त्या मंगल कार्यालयाचा उपयोग करता येईल. भोई समाजाला आपलं हक्काचं मंगल कार्यालय म्हणून त्याचा संपूर्ण भोई समाजाला त्याचा सदुपयोग करता येईल. स्मशानभूमी उभारणी करावी - बऱ्याच ठिकाणी अजूनही गावागावात उच्च निच्छ, जातीपाती यात कट्टरपणाने वागल्या जाते. अजूनही उच्च समाजातील मराठा समाज, व इतर उच्च समाजातील लोक त्यांच्या उच्च / मराठी समाजाच्या स्मशानभूमीत इतर कुठल्याही जातीच्या माणसाला जाळण्याची अनुमती देत नाही. प्रत्येक वेळी विरोध केला जातो. त्या विरोधापाई इतर समाज आपल्यांचे देह दहन कुठेतरी लांब गावाबाहेर डोंगरात, दर्या-खोऱ्यात, ओढ्या- नाल्याकडे जाऊन करतात. गावातील स्थानिक स्वराज्य संस्था याकडे दुर्लक्ष करतांना दिसते. काही ठिकाणी स्मशानभूमी असतीलही पण त्या ठिकाणी जाण्याच्या वाटा बंद करण्यात आल्या आहे. काहींनी त्या नद्यांवर अतिक्रमण करून, शेती करत नद्यांची नाले केली आहे. काही ठिकाणी स्मशानभूम्या उघड्यावर आहे. काही पडक्या-दुडक्या अवस्थेत आहे. आजूबाजूला, वर खाली ना छत ना संरक्षण भिंत. अशा दयनीय अवस्थेत आहे. ज्या-ज्या ठिकाणी भोई समाजाला व इतर समाजाला स्मशानभूमीची अडचण आहे / वाद आहे. अशा ठिकाणी चौकशी करून, माहिती अहवाल मागावून त्यावर विचार करून, योग्य निर्णय घेत भोई समाजासाठी तसेच त्याच ठिकाणी राहणाऱ्या इतर समाजासाठी, भोई समाज आणि इतर समाज यांच्यासाठी एकच पण इतर वादग्रस्त समाजापासून वेगळी स्मशानभूमी उपलब्ध करून देण्याचे सहकार्य, सरकारने त्यांच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून करावे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या योजना - इतर मागास बहुजन कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य अंतर्गत जसे धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम् योजने सारख्या योजना भोई समाजाच्या विद्यार्थ्यांच्या नावाने असाव्या. इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या योजना ह्या भटक्या विमुक्त भोई समाज (NT-B )अशा वैयक्तिक नावाने अधिकृत नोंदणी व योजना असाव्या. कृषी योजना - ज्या भोई समाजाकडे वडिलोपार्जित शेत जमीनी आहे. समाजातील अशा लोकांसाठी कृषीच्या योजना ह्या भोई समाज कृषी योजना उपलब्ध करून द्यावे. महाराष्ट्र कृषी विभागामार्फत महाडीबीटी प्रणाली अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कृषी योजनांमध्ये विमुक्त जाती-भटक्या जमाती (NT-B) प्रवर्गातील भोई समाजातील शेतकरी व मत्स्यव्यवसायाशी संबंधित लाभार्थ्यांसाठी स्वतंत्र लाभार्थी घटक निर्माण करून विशिष्ट कृषी योजनांमध्ये स्वतंत्र अधिकृत तरतूद करण्यात यावी.विशेषतः कृषी साहित्य, कृषी यांत्रिकीकरण, सूक्ष्म सिंचन, शेततळे, फलोत्पादन तसेच PM-RKVY अंतर्गत Rainfed Area Development (RAD) मधील मत्स्यपालन व एकात्मिक शेती घटकांचा लाभ भोई समाजातील पात्र लाभार्थ्यांना प्राधान्याने मिळण्यासाठी स्वतंत्र NT-B (भोई) घटक/उपयोजना महाडीबीटीवर अधिकृतपणे समाविष्ट करण्यात यावी. भोई समाज विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाची या वैयक्तिक नावाने तरतूद असावी - इतर मराठा समाजाप्रमाणे अण्णासाहेब महामंडळ , गोरमाटी समाजासाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ उपलब्ध करून दिले आहे त्याचप्रमाणे भोई समाजालाही सरकारने न्याय मिळवून द्यावा. भोई समाज विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाची स्थापन करण्यात यावी. इतर मागासवर्गीय (OBC) प्रवर्गात भोई समाजाची दखल न घेता, भटक्या विमुक्त जाती (NT-B ) प्रवर्ग भोई समाज मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या आर्थिक योजना अशी भोई समाजाची वैयक्तिक नोंद भोई समाज आर्थिक विकास महामंडळे या नावाने त्याची अधिकृत तरतूद असावी.भोई समाज विकासासाठी वरील मुद्द्ये लक्षात घेऊन भोई समाजाच्या विकासासाठी वरील योजनेंची गरज मूलभूत सुविधांमध्ये त्याची गरज भासत आहे. वरील योजना तसेच आणखी येणाऱ्या, असणाऱ्या शासनाच्या योजना ह्या वैयक्तिक भटक्या विमुक्त जातीतला NT-B प्रवर्गातला दुर्लक्षित घटक भोई समाजाला त्याच्या वैयक्तिक नावाने अधिकृत योजनांची तरतूद करून शासनाच्या प्रत्येक योजनेसाठी, भोई समाजाच्या नावाने योजना अशी भोई समाजाची वैयक्तिक अधिकृत नोंद करण्यात यावी. अशी समस्त भोई समाजाच्या वतीने विनंती करतो. धन्यवाद....

**- लक्ष्मण वाल्डे (भोई )**
**ता.कन्नड जि.छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं-8888606068**

# गहन, समृध्द आणि वैश्विक दृष्टी देणाऱ्या कविता

डॉ. सुधीर देवरे यांचा आताच प्रकाशित झालेला "पाय नसलेली माणसं" हा अद्वितीय, कवितेतला नवीन पायंडा पाडणारा आणि विचारप्रवर्तक असा कवितासंग्रह आहे. या संग्रहात त्यांनी मानवी जीवनाच्या विविध नैसर्गिक पैलूंवर कविता लिहिल्या आहेत. यातल्या सर्वच कविता वाचकांना पूर्णपणे आकलन होतील अशा नसल्या तरी त्या भावप्रवृत्त करतात. कवितेत विविधतेने नटलेली सहज भाषा येते, विशेषत: अहिराणी भाषेचा वापर करून कवितांना एक विशिष्ट साज मिळाला आहे. हा अहिराणी भाषेचा लहेजा मुळातून आलेला आहे, हाटकून नाही. या समग्र कवितेत मानवी जीवनाचे चित्रण व वैश्विक नैसर्गिक लिलांचे दर्शन असून कवितेचे मुळे खूप खोल जमिनीत रुतलेले आहेत. म्हणूनच या कविता वाचताना झाडांचेच जंगल कायम सामोरे येत राहते. आपण जंगलाच्या निरवतेत समाधी लाऊन बसलोत आणि आपले अस्तित्वभान तपासत आहोत असे ही कविता वाचताना वाटत राहते.

उदाहरणार्थ म्हणून 'टणकन आवाज नाही!' ही कविता पहा :'कामाची पावती मिळत नाहीयशाची खात्री नाहीआजूबाजूला वाजणारे डिजेशांत होत नाहीतसमोर आपलं नाव असूनहीव्यक्ती भलतीच उगवते... आपली मान दुखून येते निसर्ग ढुंकून पहात नाही; आख्ख जग मोबाईल चाळत राहतंअथवा बोलत...कोणी कोणाच्या खिजगणतीत नाही!जे कळपानं येतातते पाय आपटतनाचत राहतात!- नुसतं नाणं खणखणीत असून उपयोग काय भयंकर गदारोळातटणकन आवाज नाही!'

या कवितेत चेहरे नसलेले अनेक सर्वसामान्य लोक घोळक्यात असल्याचे आपल्याला दिसून येते, जे अस्तित्वात असूनही कोणाच्या खिजगणतीत नाहीत, त्यांचा ठळक आवाज ऐकू येत नाही.

कवितासंग्रहात अनुक्रमे 'पाय बदलता येत नाहीत', 'पावसात पाय पसरून' आणि 'असमान पायांच्या कविता' असे तीन भाग जाणीवपूर्वक केले असून यामागे कवीची एक विशिष्ट मांडणी असल्याचे दिसून येते. 'ओयासिस फक्त वाळवंटातच असतं असंही नाही' या कवितेत कवी कसे व्यक्त होतात पहा :'कदाचित असू शकेल पुढं,हिरव्यागार झाडांच्या घनदाट सावलीचं खळं!सीमा नसलेल्या अनंत आभाळाखालीगोड पाण्याचं तळं!...सृष्टीत फक्त वाळवंटच असतं असं नाही.ओयासिस फक्त वाळवंटातच असतं असंही नाही.'

ही कविता मानवी जीवनाच्या रोजच्या समस्यांचे दर्शन घडवते. प्रचंड व्यापातून, अनेक अडचणींतून वाट काढत बहुतांश लोक रोजची जगण्याची लढाई आपापल्या परीने लढत राहतात आणि जीवन जगत राहणे एवढे एकचएक ध्येयही त्यांना पूर्ण करता येत नाही, हे वास्तव या कवितेतून सामोरे येते.

ह्या समग्र कवितेत विचारप्रवर्तक प्रतिभा उमलत राहते, ह्या कविता वाचकांना विचार करायला भाग पाडतात आणि वाचकांच्या मनात दैहीकतेपासून वैश्विक प्रश्न निर्माण करतात. "पाय नसलेली माणसं" ह्या संग्रहातली सगळीच कविता मानवी जीवनाच्या निरर्थकतेबद्दल, अनिश्चिततेबद्दल, अपूर्णतेबद्दल बोलते. तसेच डार्वीन नियमाच्या संघर्षाला अनुसरत, पायांवर न झुकता पुढे चालण्यासाठी वाट काढत राहते.

'अपूर्ण देहांच्या आयुष्यात!' नावाची एक अतिशय सुंदर आणि तरल कविता या संग्रहात वाचायला मिळाली : 'परक्या प्रदेशातल्या अगम्य भाषेतनिसर्गाविरूध्द की सत्तेविरूध्द फिर्याद कुठं करावी माहीत नाही!तक्रार न करता रसिकतेनं जगता येईल इतकंही जग सुंदर नाही- अपूर्ण देहांच्या आयुष्यात!'

स्वत:च्या पायांवर उभा राहील, लाथ मारीन तिथे पाणी काढीन, नोकरीवर लाथ मारेल असे अनेक वाक्प्रचार मानवी पायांवर दिसून येतात. म्हणजे पाय हा जीवनाचा मुख्य अवयव आहे. हे दोन पाय ज्याच्या नशीबी शाबूत नसतील तो जगाला कसा सामोरा जाईल? या जगात त्याची काय परवड होते, असे अनेक प्रश्न या संग्रहातील कविता उपस्थित करत राहतात. अपूर्ण देहांच्या आयुष्यात पावलोपावली युध्दाचे प्रसंग आहेत.

लेखात तीनच कवितांचा उल्लेख केला असला तरी संग्रहातील सगळ्याच कविता गहन, समृध्द आणि वैश्विक दृष्टी देणाऱ्या आणि आज लिहिल्या जाणाऱ्या कवितेपासून दूर आहेत. या कविता पारंपरिक नाहीत. अतिशय तरल अशी ही वेगळी कविता असल्याने ह्या कवितेशी अन्य कोणत्याही कवीची तुलना करता येणार नाही. म्हणूनच हा कवितासंग्रह वाचला- अभ्यासला पाहिजे!

**पाय नसलेली माणसं**
सुधीर राजाराम देवरे
शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.
मुखपृष्ठ : सरदार जाधव.
पृष्ठ : १७५ किंमत : ३०० रू.

# शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी शासन कटिबद्ध - पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे



**बीड : (भगवंत पाळवदे)** यावर्षी पावसाने ओढ दिल्यामुळे बीड जिल्ह्यातील अकराही तालुक्यांवर दुष्काळाचे संकट ओढवले आहे. पावसाच्या अभावामुळे शेतकऱ्यांची उभी पिके करपली असून हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. या पार्श्वभूमीवर,पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी बीड व पाटोदा तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करत थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी बीड व पाटोदा तालुक्यातील विविध दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करत थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली.या पाहणी दौऱ्यादरम्यान त्यांनी बीड तालुक्यातील वंजारवाडी, काकडहिरा, मुर्शदपूर, लिबांदेवी तसेच पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी नायगाव, रोहतवाडी, तांबा राजुरी, तळे पिंपळगाव, करंजवण आदी गावांमधील शेतशिवारात प्रत्यक्ष जात पिकांच्या नुकसानीचा आढावा घेतला. या वेळी त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या व्यथा व अडचणी जाणून घेतल्या. या कठीण काळात शासन खंबीरपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. इतिहासात पहिल्यांदाच केंद्र आणि राज्याचे पारंपरिक निकष बाजूला सारून शासनाने जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केला आहे. प्रशासकीय यंत्रणेला पिकांच्या नुकसानीचे व पंचनाम्याचे काम अचूक आणि वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तोंडावर आलेला सण पाहता, शासनाकडून शेतकऱ्यांच्या संकटांची तीव्रता कमी करण्यासाठी आणि त्यांची दिवाळी गोड करण्यासाठी ठोस पावले उचलली जात आहेत. तसेच ३२ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी असो वा इतर मदत, शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.सध्याच्या आपत्कालीन परिस्थितीत शासनाच्या या संवेदनशील भूमिकेमुळे शेतकरी वर्गाला मोठा आधार मिळाला असून, प्रशासनाकडून मदतीची अंमलबजावणी युद्धपातळीवर सुरू असल्याचेही पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०५ ऑक्टोबर २०२६


# चेहरा जातधर्माचा आकाशाला, निळाईचे स्वातंत्र्य उरले नाही.....

**कन्नड (अरुण थोरात):** "चांदण्यात फिरण्याचे स्वातंत्र्य उरले नाही, कळ्यांना बहरण्याचे स्वातंत्र्य ऊरले नाही,रंगातूनही शोधती ते चेहरा जातधर्माचा..आकाशाला निळाईचे स्वातंत्र्य उरले नाही....प्रा. प्रतिभा अहिरे यांच्या या कवितांनी रसिक मनाची मशागत केली. प्रतिभा अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कविसंमेलनात विचारप्रवर्तक कवितांनी रसिकांना अंतर्मुख केले. बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय, त्रैमासिक तिफण आणि शिवाजी महाविद्यालय, मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने म. गांधी जयंती आणि मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या द्वितीय वर्धापन दिनानिमित्त निमंत्रितांचे कविसंमेलन शनिवारी दि. ०३ आक्टोंबर रोजी संपन्न झाले. या कविसंमेलनात सामाजिक, राजकीय,पर्यावरण आदि विविध विषयांना कविंनी ऐरणीवर घेतले.या कविसंमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध कवी डॉ. शिवाजी हुसे यांच्या हस्ते झाले. यावेळी नायब तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे यांनी राजकीय विसंगतीवर विडंबन सादर केले.""नेत्याने कार्यकर्त्याला असे दान द्यावे,रात्रंदिन नुसते गोडवेच गावे...नेत्याने जनतेला असे दान द्यावे...आश्वासनांचे नुसते पुर यावे..." या कवितेला रसिकांनी भरभरून दाद दिली.ज्ञानेश्वर गायके यांनी दुष्काळाची दाहकता मांडली.."शिवार भकास आता सारे,कोरड्या मातीची करूण कहाणी..."श्रीराम दापके यांनी रानफुलांचा वेध घेतला...चला बाळांनो पाहू ते गुलमोहराचे झाड...पानं हिरवे लुगडे, कुंकु कपाळी शोभे...."भगीरथ अंधानेरकर यांनी मानव धर्माला जागण्याचे आवाहन केले..."कर्तव्याला जागा मानवा जागे होऊन जगामध्ये फुलवसुंदर बाग मानवा..."प्रा.कारभारी भानूसे यांनी प्रेम कविता सादर करून नवे रंग भरले.."तुझं असणं म्हणजे जणू काही उन्हातल्या थंड वाऱ्याची लाट असते.. तुझ्या एका मंद हास्यात उजळून निघालेले पहाट असते..."अशोक दुधकर यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त केली.. "आंबेडकरांनी बहुजनांसाठी केले चांगले काम... दलितांसाठी खुले केले मंदिर काळाराम ...लिहून राज्यघटना फुलवले लोकशाहीचे मळे.. भीमरायाची साक्ष देते महाडचे ते तळे...अनिता राठोड यांनी स्त्रीयांवर अन्यायाची दाहकता मांडली.."पुन्हा एकदा कानी आली... बलात्काराची बातमी, हळहळ सहानुभूती श्रद्धांजली पुन्हा एकदा.....शिवनाथ गायकवाड यांनी वाढते सिमेंटीकरण आणि वृक्षतोड यावर प्रकाश टाकला.."व्यापलेले शहरीकरण वृक्षाचे सतत अमानुष मरण...'या अशा कवितांनी उपस्थित रसिकांना विचार करण्यास बाध्य केले. या कविसंमेलनात मृणाल आव्हाळे, समृध्दी आव्हाळे, शुभदा देवरे, शिवानी पाटील, रमेश वाघचौरे, दत्ता मोरस्कर, भिमराव सोनवणे, लक्ष्मण वाल्डे, ऋषिकेश आव्हाळे,प्रभात शेळके,रोशन राजपूत,पुजा चव्हाण या कविंनी दमदार कविता सादर केल्या. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून अॅड. कृष्णा जाधव, डॉ. रामचंद्र झाडे उपस्थित होते. अनिता राठोड व प्रवीण दाभाडे यांनी बहारदार सूत्रसंचालन केले.

यावेळी रमेश गिरी, मृणाल आव्हाळे, प्रथमेश शिंदे, वैभव वेताळ, शुभदा देवरे, अपर्णा घाटबळे, प्रकाश शहरवाले, ब्रम्हगिरी गोस्वामी, रामेश्वर मोरे, संदीप वाकडे, धिरज चव्हाण, अथर्व कापुरे, शेख मुजाहिद, विशाल जाधव, गणेश निळ, मयुर साबळे, प्रगती पवार, अनशरा बेग, तेजस्विनी भोसले, प्रांजल महाजन, अमोल मोकासे, भारत सोनवणे, अजय दवंडे, जनार्दन गोरे, सागर महाराज दहातोंडे, पुजा चव्हाण, आदिती चव्हाण, संकेत निकम, मथुरा काकडे, समृद्धी मोतिंगे, अक्षरा चव्हाण, इब्राहिम पठाण, तनिष्का खंडेलवाल, विद्या बनकर, तेजस नागरे, वैशाली वारेगावकल आदिंसह मोठ्या संख्येने रसिक उपस्थित होते.

## राज्यस्तरीय धनुर्विद्या चॅम्पियन स्पर्धेत,.. रिकर्व्हमध्ये सोलापूरचा दबदबा; सांघिक व मिश्र प्रकारात सुवर्णपदक

**जालना ता.४(प्रा डॉ राजेंद्र सोनवणे) :** राज्यस्तरीय धनुरधारी चॅम्पियन स्पर्धेचा समारोप कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून जालनाचे आमदार अर्जुनराव खोतकर हे होते. त्यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना सुवर्णपदक, सिल्वर पदक पाचशे पदक देऊन गौरवण्यात आले.महाराष्ट्र आर्चरी असोसिएशन व भीष्मा आर्चरी असोसिएशन, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने जे.ई.एस. महाविद्यालय येथे २ ते ४ ऑक्टोबर २०२६ दरम्यान झालेल्या २३ व्या महाराष्ट्र वरिष्ठ राज्य अजिंक्यपद तीरंदाजी स्पर्धेत रिकर्व्ह प्रकारात सोलापूर, सातारा आणि पिंपरी-चिंचवडच्या खेळाडूंनी वर्चस्व गाजवले.पुरुषांच्या ओव्हरऑलमध्ये साताराच्या पार्थ साळुंखेने ६७१ गुणांसह प्रथम, सोलापूरच्या रोशन डोर्गेने ६५६ गुणांसह द्वितीय, तर बुलढाण्याच्या स्वराज हिंगेने ६५५ गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. वैयक्तिक एलिमिनेशनमध्ये क्रीडा प्रबोधिनीच्या उज्ज्वल ओलेकरला सुवर्ण, पुण्याच्या रितेश देशमुखला द्वितीय आणि पार्थ साळुंखेला तृतीय क्रमांक मिळाला.पुरुष सांघिक एलिमिनेशनमध्ये सोलापूरच्या सैराज हणमे, करण सराडे, आदित्य पवार व शुभम जाधव यांनी सुवर्णपदक पटकावले. सातारा द्वितीय, तर क्रीडा प्रबोधिनी तृतीय ठरली.महिलांच्या ओव्हरऑलमध्ये पिंपरी-चिंचवडच्या शरवरी शेंडेने ६८० गुणांसह प्रथम, सोलापूरच्या गाथा खडकेने ६५७ गुणांसह द्वितीय, तर नाशिकच्या वैष्णवी कुलकर्णीने ६५१ गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. वैयक्तिक एलिमिनेशनमध्येही शरवरीने सुवर्ण पटकावले. सोलापूरच्या राजनंदिनी वाघमारेने द्वितीय, तर अमरावतीच्या तनुश्री श्रीनाथने तृतीय क्रमांक मिळवला. महिला सांघिकमध्ये नाशिक प्रथम, अहिल्यानगर द्वितीय आणि सोलापूर तृतीय ठरले.मिश्र सांघिक एलिमिनेशनमध्ये सोलापूरच्या सैराज हणमे-गाथा खडके जोडीने सुवर्णपदक पटकावले. पिंपरी-चिंचवडच्या सोहम कणसे-शरवरी शेंडे जोडीला रौप्य, तर साताऱ्याच्या पार्थ साळुंखे-मृण्मयी कदम जोडीला कांस्यपदक मिळाले.सर्व विजेत्या स्पर्धकांचे आमदार श्री.अर्जुनराव खोतकर यांनी कौतुक केले व त्यांचा सन्मान केला. यावेळी धनुर्धारी राज्य संघटनेतर्फे प्रमुख अतिथी सन्मानचिन्ह शाल श्रीफळ देऊन आमदार श्री. अर्जुनराव खोतकर, शिवसेना नेते पंडितदादा भुतेकर, डॉ. सुनयना प्रणितकर सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर या स्पर्धेचे आयोजक धनुरधारी राज्य संघटनेचे सचिव श्री प्रकाश दुसेजा, जे ई एस महाविद्यालयचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. हेमंत वर्मा, राष्ट्रीय खेळाडू तथा प्रशिक्षक श्री सचिन टेकुर, प्रा.डॉ .राजेंद्र सोनवणे , प्रा. राहुल सारस्वत यांची प्रमुख उपस्थिती होती, समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे व प्रा. सुमित आमलेकर यांनी केले, प्रमुख पाहुण्यांचा राष्ट्रीय खेळाडू तन्मय अग्निहोत्री यांनी करून दिला, तर उपस्थितांचे आभार राष्ट्रीय खेळाडू कु.भवानी कोयतलू यांनी केले. ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रा. किशोर बीरकायलू, प्रा. प्रवीण चंदनशिवे, प्रा. किशोर खरात, श्री विलास बोधले, श्री भरत अहिर यांनी परिश्रम घेतलेत. या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी जालना शहरातील व जिल्ह्यातील खेळाडू व पालक यांचे महत्वपूर्ण योगदान लाभल्याचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी सांगितले.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

